
# माणूस

१३ जुलै १९५८ । [illegible]



समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सातवा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर,

सौ. निर्मला पुरंदरे

## भैरवेश्वराचे मंदिर

भैरवेश्वर रुष्ट झाला म्हणून भूपतींद्र मल्ल राजाने हे मंदिर बांधलं आणि त्याच्या संरक्षणासाठी सर्पराज, मृगेंद्र, गजराजच नव्हे तर खुद्द भीमसेनाचीही योजना केली. भैरवेश्वर प्रसन्न झाला आणि त्याने नेपाळवर कृपाछत्र पसरलं.

मनोऱ्यासारख्या छपराची ही पद्धत नेपाळमधून चीन आणि इतर बौद्ध देशात पसरली. लाकडावरील कोरीव कामाबद्दलही नेपाळ प्रसिद्ध. देवळाभोवतीचे लाकडी खांब आणि छपराला आधार देणाऱ्या तुळया यावर नेवारी कलाकारांनी आपले कौशल्य पणास लावून पुराणातील प्रसंग रंगविले. अठराव्या शतकात नेपाळी जनतेने उत्स्फूर्त श्रमाने बांधलेले हे मंदिर काठमांडूला भेट देणाऱ्या प्रवाशांचे एक आकर्षण आहे. १९३४ सालच्या तीव्र भूकंपातही त्याला इजा पोचली नाही ही भैरवेश्वराची कृपा !

मूल्य चाळीस पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## अमेरिकेतल्या बड्याबड्यांना बेचैन करून राहिलेले

# मॅक बर्ड

'शुतुर्मुर्ग' (शहामृग) नावाच्या एका हिंदी नाटकाचा परिचय या सदरातून काही महिन्यांमागे मी करून दिला होता. राष्ट्र म्हणून तूर्त आपण दाखवीत असलेल्या शहामृग-वृत्तीवर आणि ही वृत्ती दृढमूल करणाऱ्या नेतृत्वावर वास्तवाशी पदोपदी ओळख सांगणाऱ्या एका काल्पनिक कथेच्या आधारे या नाटकात कोरडे ओढलेले होते. याच शैलीचे एक अत्यंत स्फोटक नाटक अमेरिकेत सध्या गाजत आहे, हा एक लक्षणीय योगायोग म्हणता येईल. या नाटकाचे नाव 'मॅक बर्ड'. कर्त्या आहेत कोणी एक श्रीमती बार्बारा गार्सन. त्यांचे हे बहुधा पहिलेच नाटक असावे; परंतु धंदेवाईक रंगभूमीचा आश्रय न मिळताच याचे शेकडो प्रयोग अमेरिकाभर होत आहेत. विशेषत:, कॉलेज-विद्यार्थ्यांत हे कमालीचे प्रिय झाले आहे; आणि एरिक बेण्टले यांच्यासारख्या प्रथम श्रेणीच्या अनेक नाट्य-समीक्षकांनी या सामर्थ्यवान नाटकाविषयी मुक्त प्रशंसोद्गार काढले आहेत.

'मॅक बर्ड' या शीर्षकाचे शेक्सपिअरच्या 'मॅक्बेथ'शी प्रथमदर्शनीच साम्य जाणवते; आणि ते लेखिकेला गृहीतच आहे. 'मॅक्बेथ' नाटक हाच या 'मॅक् बर्ड' नाटकाचा एक प्रकारे कणा आहे; त्या जागतिक ख्यातीच्या अमर नाटकावरूनच हे बरेचसे बेतले आहे. जबर महत्त्वाकांक्षी स्त्रीच्या बाईल-वेड्या पण कर्तृत्वशाली नवऱ्याचे काय होते, ते राजघराण्या-तल्या एका काल्पनिक कथेद्वारे 'मॅक्बेथ'मध्ये विलक्षण प्रभावी-पणे शेक्सपिअरने दाखवले आहे. एक प्रकारे, अनावर महत्त्वा-कांक्षा माणसांचे काय करते, हाच या नाटकाचा शोकात्म




**" The Play's The Thing**
**Wherein I'll Catch The Conscience of the King "**

*BARBARA GARSON*

आणि चिरस्थायी बोध आहे. आता गार्सनबाईंच्या ' मॅक बर्ड 'मध्ये पुनश्च हाच बोध घडवण्यात आला आहे परंतु याची कथा तितकीशी काल्पनिक नाही. ती भूतकालीन इतिहासात नेऊन बसवलेली नाही, ती वर्तमानकालीन आहे, अद्याप चालू आहे आणि जगभर पडसाद उठलेल्या, अमेरिकन इतिहासातील अगदी अलीकडच्या काही खळबळजनक नि वादग्रस्त घटनांचे संदर्भ तिला आहेत. म्हणूनच तिचा बोध अधिक जळजळीत वाटतो. ' मॅक्बेथ ' नाटकाशी मार्मिक साम्य सांगणारे तिचे संदर्भ तिचे कालातीत स्वरूप प्रस्थापित करतात आणि तरीही ती आजची राहते, या घटकेची राहते.

जुन्या पाश्चात्त्य नाटकातून तत्कालीन वेषात रुबाबदार सूत्रधार येतो आणि तो नाटकाच्या विषयाची काव्यमय प्रस्तावना करतो. या एक प्रकारे सामाजिक–ऐतिहासिक नाटकात पडदा वर जाताच सूत्रधार प्रवेश करतो तो उंची अद्ययावत सूटबुटात. फक्त त्याच्या हॅटमध्ये पीस खोवलेले असते आणि कमरेला लुटुपुटीची तलवार त्याने बांधलेली असते. काव्यात्म शैलीतच तो प्रेक्षकांना म्हणतो की राज्ये, राजपुत्र, सम्राट आणि अशाच इतर दर्जेदार, वजनदार विषयांवरून तरुण प्रेमाची

कोवळी लफडी आणि प्रौढ विवाहितांमधल्या वातड संघर्षापर्यंत उतरलेल्या कवि-प्रतिभेच्या प्रगतिशील परंपरेला धरून आमच्या या नाटकातले युद्धनिपुण नेते आज जुन्या राजपुरुषांप्रमाणेच आजच्या नव्या राजपुरुषांशी साम्ये दाखवीत रंगमंचावर येतील. दोन राजघराण्यांतला हा एक नवा संघर्ष आहे. या संघर्षातले अव्वल आधुनिक साम्राज्य, विविध यंत्रणांचे वैभव, त्यातली दिग्गजांसारखी व्यक्तिमत्त्वे हा लाकडी हलका रंगमंच कसा तोलू शकणार बरे ? म्हणून आमचे नट या सगळ्या अद्‌भुतांचे एक नाटक सादर करतील. परंतु रसिक मंडळी, आमच्या नाटकाच्या कथानकातले गहाळ वा अस्पष्ट दुवे शोधण्यासाठी तुमच्या कल्पनाशक्तीला मुळीच व्यर्थ ताण देऊ नका कारण, जे भासते ते सहसा स्पष्ट करून मागू नये. आपणा मंडळींच्या तात्पुरत्या वा सर्वकालीन निर्बुद्धपणाचेच अवगुंठन आमच्या राजपुरुषांचे लज्जारक्षण करणार आहे.

## सूचक भविष्य

नाटक सुरू होते ते 'मॅक्बेथ' प्रमाणे तीन हडळींच्या अभद्रसूचक प्रवेशाने. फक्त या हडळी म्हणजे अनुक्रमे बीटनिक वेषातला विद्यार्थी निदर्शक, नीग्रो कंगाल माणूस आणि जुनाट सहप्रवासी जहालमतवादी असे तिघे आहेत. आणि या प्रवेशाचे स्थळ आहे अमेरिकेतल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या मेळाव्याचे. दुसऱ्या प्रवेशात या मेळाव्याच्याच वेगळ्या दालनात जॉन, रॉबर्ट आणि टेडी असे तिघे बंधू खलबते करताना दाखवले आहेत. यातला जॉन आणि रॉबर्ट बरेच एकसारखे दिसतात, एकसारख्या लकबींनी बोलतात, चालतात. जॉन अधिक आत्मविश्वासयुक्त आणि अंगाने जरा मोठा आहे. 'मॅकबर्ड' हाच त्यांच्या चिंतेचा विषय आहे. या 'लठ्ठ पण बुभुक्षित दिसणाऱ्या' धोकेबाज माणसाला 'राज्यपदा' पासून कसा दूर ठेवावा त्याचा खल ते करताहेत. आपापसात त्यांनी या पदासाठी एकमेकांचे सनवार क्रम लावूनदेखील टाकले आहेत. वंशपरंपरा हे पद आपल्या घराण्यातच राहणार असे त्यांनी पक्के गृहीत धरले आहे. हे तिघे जातात आणि त्या तीन हडळी तिथे येतात. आपले अखंडित असंतोषजनक उद्योग त्या बोलतात. आणि 'मॅकबर्ड' त्याच्या एका 'हस्तका' समवेत रुबाबात प्रवेशतो. खुर्च्यांमागे अर्धवट लपलेल्या हडळींना मेळाव्याचे प्रतिनिधी आणि आपले जरा संकोची पाठराखे समजून तो हटकतो. मग त्यांचे अवतार पाहून त्याच्या लक्षात येते, की हे लेकाचे विरोधी निदर्शक दिसतात. हस्तक पोलिसांची कुमक मागवण्याला निघतो पण मॅकबर्ड म्हणतो, जरूर नाही. कुणाशी कसे वागावे ते मी चांगले जाणतो; आणि त्या तिघांची हकीकत तो पुसतो. तिन्ही 'हडळी' त्याचा सीनेटचा म्होरक्या, उपाध्यक्ष आणि भावी अध्यक्ष म्हणून जयजयकार करतात आणि त्याचे भविष्य सांगतात. मॅकबर्ड सर्वसामर्थ्यवान होणार. पण 'केन्-ओ-डंक' (आपल्या प्रवेशात त्या त्रिकुटातला थोरला भाऊ—जॉन) राजा होणार. तो वारस नेमून जाणार. 'केन-ओ-डंक' अन्य राजेमंडळी-

प्रमाणेच अस्सल राजाचा रुबाब करील पण आमच्या नाटकात तोदेखील 'एक्स्ट्रा' च ठरणार. रंगमंचावर तो आपला काळ वाजवील, गाजवील आणि पिटातून त्याला भरपूर टाळ्या–शिट्ट्यादेखील मिळतील पण एक दोन पाने टाकून भविष्याचे जरा नंतरचे पान पाहिले, तर कळेल की या नाटकात अखेर उरणार त्या आम्हीच तीन हडळी. 'मॅकबर्ड'चा यावर तितकासा विश्वास बसत नाही. तो विचारतो, पण 'केन-ओ-डंक' माझी घृणा करीत असताना मी उपाध्यक्ष होणार तरी कसा? आणि अध्यक्षपदाची तर गोष्टच त्याच्या कारकीर्दीत अशक्य! पण यावर जबाब न करता हडळी निघून जातात आणि 'केन-ओ-डंक'चा भाऊ रॉबर्ट प्रवेशतो. दुय्यम स्थान पत्करण्याची 'मॅकबर्ड'ची तयारी असल्यास त्याला उपाध्यक्ष करण्यात येणार असल्याचे तो घोषित करतो. 'मॅकबर्ड' स्वगत म्हणतो, उपाध्यक्ष— आणि भावी अध्यक्ष! हडळींचे भाकित एकूण खरे ठरणार तर! तिसऱ्या प्रवेशात 'केन-ओ-डंक'च्या राहत्या खोलीत मॅकबर्डची केन-ओ-डंकशी भेट ठरलेली असते. तिघे भाऊ सल्लागारांच्या घोळक्यात आपल्यात एकोपा ठेवला पाहिजे हे एकमेकांना बजावताना दिसतात. 'मॅकबर्ड' प्रवेश करतो. त्याचे थंडेच स्वागत होते जॉन रॉबर्टला आपला नियोजित कायदा–प्रमुख म्हणून आपण नियुक्त केल्याचे घोषित करतो. 'मोहिमे'ची म्हणजे निवडणूक–मोहिमेची तयारी सुरू होते. यात 'मॅकबर्ड'ला डावलण्यात येते. 'कॉम्प्यूटर' यंत्रांचेच सल्ले घेतले जातात. दुखावलेला मॅकबर्ड स्वगत चडफडत म्हणतो, चाळीस वर्षांचा मोहिमांचा आमचा अनुभव, परंतु आमच्याऐवजी येथे यंत्राचाच मान, अं! 'हस्तक' सुचवतो, इथे त्यांना तुमची किंमत नाही, पण तुमच्या बालेकिल्ल्यात त्यांना न्या. काहीतरी व्यूह रचून तिथे एकदा त्यांना नेले की तुमचे सामर्थ्य त्यांना प्रत्यक्ष जाणवेल, कानांनी ऐकण्याला आणि डोळ्यांनी पाहण्याला मिळेल. मॅकबर्डला ही कल्पना रुचते. नियोजित 'राज्यारोहणा'नंतर केन-ओ-डंकला आपल्या मुलखात सन्मान–सोहळ्यांनिमित्त बोलवून आपल्या सामर्थ्याचे दर्शन घडवण्याचे तो ठरवतो. निरोप देणाऱ्या रॉबर्टबद्दल त्याला अभिवादन करून तो स्वगत म्हणतो, हा कायदा–प्रमुख जहन्नममध्ये जावो लेकाचा–हा माझ्या महत्त्वाकांक्षेच्या मार्गातला खरा काटा आहे! हे ताऱ्यांनो, आपला प्रकाश आवरा. माझ्या मनाच्या गर्तेतल्या काळ्या कुट्ट विचारांचा सुगावा इतक्यात कोणालाही लागता कामा नये!

## लेडी मॅकबर्डचे स्वगत

चौथ्या प्रवेशात लेडी मॅकबर्ड पतीचे पत्र वाचताना दिसते. उपाध्यक्षपदासाठी 'केन-ओ-डंक'ने आपले नाव मुक्रर केले आहे पण हे दिसते तितके साधे नाही, काहीतरी काळे कारस्थान यामागे असू शकेल. काय ते अद्याप कळत नाही पण काही का असे ना, दोन मोहरे मागे पडले, एकाचाच प्रश्न राहिला असे मॅकबर्डने पत्रात पत्नीला लिहिले आहे. लेडी मॅकबर्ड हे पत्र वाचून स्वगत बोलते त्यात ती आपल्या

पतीचे मार्मिक वर्णन करते. ती म्हणते, तुमच्या मनातले ग्रह-आग्रह इतके असतात की नजीकचा आणि सोपा मार्ग तुम्हाला कधी दिसतच नाही. एखादी उघडी-नागडी कृती तुम्हाला नको असते. तुम्हाला ती शानदार भाषेत अवगुंठित अशी लागते. तुम्हाला महत्त्वाकांक्षा नाही असे नाही, पण आपल्याला हवे ते मान्य करण्याची धिटाई तुमच्यापाशी नाही. तुम्ही सुवर्णाची भेट स्वीकाराल पण तिच्यामागला हेतू विचारण्याच्या भानगडीत पडणार नाहीत. कृती पुरेशी भोंगळ असून भागणार असेल तर तुम्ही लांडीलबाडीही कराल. पण तिला एखादे उदात्त, साळसूद रूप देणे जमले नाही तर तुम्हाला ती पुरती पचवताच येणार नाही. कितीदा तरी मी तुमच्यासाठी महत्त्वाचे लागेबांधे जमवले—त्यांसाठी लागणारी सारी बद-कर्मे मी केली. एकाच हेतूने की लाभ तुमच्या पदरी पडावा, आणि डौलाने तुम्ही त्याचा स्वीकार करावा. मी नाटकाची पूर्वतयारी करीत असते तेव्हा आपला जणू संबंधच नाही असे दाखवण्यात आता तुम्ही किती वाकबगार बनला आहात; आणि सगळी तयारी झाली की तुम्ही प्रमुख पात्रासारखे डौलाने प्रवेश करता. कलेचा अभाव लपवणाऱ्या तुमच्या आत्मवंचनेचे भानही तुम्हाला नसते. पुष्कळ काही व्हावे असे वाटते तुम्हाला—झालेले आवडेल—पण आपलेच हेतू आपल्याला स्वच्छ दिसतील, या भयाने ते तुम्ही करणार नाहीत. तुम्हाला जळजळून हवे तेही तुम्हाला शुचिर्भूत-पणे हवे !

'मॅकबर्ड' प्रवेश करतो. 'राज्याभिषेका'नंतर 'केन-ओ-डंक'ला आपल्या बाले-किल्ल्यात येण्याचे निमंत्रण देण्याचा मनोदय बोलतो. तो म्हणतो, आमचे प्रभावी सामर्थ्य त्यांना दिसले पाहिजे. केवळ आमचा मुलूखच नव्हे तर त्यातल्या आमच्या निष्ठावंत पाठीराख्यांचा प्रत्यक्ष प्रत्यय त्यांना दिसला पाहिजे. लेडी मॅकबर्ड यावर लगेच स्पष्टीकरणादाखल म्हणते, म्हणजेच त्यांच्या शत्रूंच्या विरोधाचा प्रखर अनु-भव त्यांना दिला पाहिजे. मॅकबर्ड चमकून म्हणतो, अनुभव दिला पाहिजे ? लेडी मॅकबर्ड म्हणते, हो, फक्त अनुभव द्यायचा. जास्त काहीच नाही. जे तुमच्या मनात आहे, जे तुम्हाला हवे आहे, तेच तर मी म्हणते आहे. तुमच्यासाठी काहीही कर-तील असे तुमचे अभिमानी आश्रित या भागात काही कमी नाहीत ! मॅकबर्ड जरा घसकूनच म्हणतो, पुरुषार्थाला साजेसे काहीही करण्यात मला प्रत्यवाय नाही. लेडी मॅकबर्ड म्हणते, मी पुरुष नाही. मी आपली साधी एक स्त्री आणि या दक्षिण भागातली आदरातिथ्यशील गृहिणी आहे, महाराज. आपल्या पाहुण्यांचे उत्तम आणि स्नेहशील स्वागत तेवढे मी करीन.

### 'केन–ओ–डंक'ची अखेर

या प्रवेशानंतर 'राज्यारोहणा'चा प्रवेश येतो. लंबीचवडी, सुंदर सुंदर शब्दांची उंच उंच आशयाची भाषणे होतात. खुद्द जॉन केन-ओ-डंक एक वक्तृत्वपूर्ण, उदात्त स्वरातले भाषण करून सर्व जगाला अभय आणि राज्याच्या वर्धिष्णू सामर्थ्याची ग्वाही

देतो. आपल्या ' न्यू फ्रॉंटिअर 'च्या धोरणाचा उच्चार तो करतो. इकडे मॅकबर्ड याने चडफडून स्वगत बोलतो, या राज्यात भारदस्त शब्दांच्या दर्दी मुत्सद्यांची सद्दी संपून किरटया स्वरात किरकिरणाऱ्या राजघराण्यांतील उतावळया नवऱ्यांचे दिवस आले आहेत. पिढीजाद राजकारण्यांची जागा कॉलेजमधून नुकती बाहेर पडलेली पुस्तकी पोरे घेत आहेत. राजकारणाचा पक्का रंग उडून आता नुसतीच रंगोटी राहिली आहे. मर्दुमकीच्या झुंजींना चावत चिवचिवत उच्चारलेल्या शब्दांनी हद्दपार केले आहे. हे म्हणतच तो या मामल्याशी स्वतःची तुलना करून जळत राहतो. संधी मिळताच आपल्या मुलखात येण्याचे नम्र निमंत्रण केन-ओ-डंकला देतो. आत्मविश्वासाने ओथंबणारा केन-ओ-डंक ते स्वीकारतो. प्रवेशाच्या अखेरी मॅकबर्डचे स्वगत शब्द आहेत, नको तो विचारही आता नको ! पण तसेच घडणार; हातांनी घडल्यावर नजरेचा थरकाप उडवणारे घडणार !

या पहिल्या अंकाच्या अखेरी, मॅकबर्डच्या दक्षिण मुलखात आलेल्या केन-ओ डंकचा भर रस्त्यात खून होतो. गोंधळ, जमावाचे विविध उद्गार; बंदुकीचा बार, आणि पडद्यावर खून कसा घडला त्याच्या नकाशाची स्लाइड दाखवून हा परिणाम साधण्यात आला आहे.

लेडी मॅकबर्डचे चलबिचल होऊ लागलेले मन, नंतरचा जनतेचा शोक, मारेकऱ्याला पकडल्याची वार्ता आणि त्यालादेखील मारण्यात आल्याची मॅकबर्डने लेडी मॅकबर्डला सांगितलेली वार्ता यात हा पहिला अंक एका उत्कट बिंदूपर्यंत भरारा चढून संपतो. त्याची अखेर मॅकबर्डच्या जनतेला उद्देशून दिलेल्या संदेशाने होते, या माथेफिरू प्रवृत्तीला पायबंद घातलाच पाहिजे. लोकहो, शांत राहा, राज्याचा नवा कर्णधार म्हणून मी ही विनंती करतो आहे.

दुसऱ्या अंकाचा आरंभ, उरलेल्या दोन ' केन-ओ-डंक ' बंधूंच्या चिंताग्रस्त चर्चेने होतो. रॉबर्ट म्हणतो, दादांना मारणाऱ्या खुनी बंदुकीतली काडतुसे अद्याप बाकी आहेत. आपण तिचा नेम कसा चुकवावा यासाठी प्रयत्न करावा हेच ठीक. टेडी लगेच म्हणतो, चला तर मग पळून जाऊ या. रॉबर्ट म्हणतो, भक्ष्य पळतानाच बंदुकीला अचूक नेम साधता येतो. ओसाडीतून माळावरून ते एकटेच कसे जीव घेऊन धावताना स्वच्छ दिसते. त्यापेक्षा गर्दीत मिसळून राहावे हे बरे. कदाचित नेम हुकेल ! एकाच बाराने मला थोरला ओरडा होईल असे भय


सोने-चांदीच्या
तसेंच
खड्यां मोत्यांच्या कलात्मक
दागिन्यासाठी.
व्ही. एस. मालडकर
आणि कं. ज्युवेलर्स
एन. सी. केळकर रोड दादर, मुंबई-२८

देखील शिकाऱ्याला जरा विचार करायला लावील. मॅकबर्डविरुद्ध कोणत्या शक्ती एकवटता येतात त्याचा अंदाज घेत मी तरी असाच गर्दीत मिसळून संधी हेरीत राहणार आहे.

नंतरच्या प्रवेशात राज्यातली कुजबूज कानी जाऊन 'कर्णधार' मॅकबर्ड अस्वस्थ झालेला दिसतो. तो म्हणतो, व्यक्तिगत निंदानालस्तीची आम्हाला क्षिती नाही, ती यापूर्वीही आम्ही अनुभवली आहे; पण खुद्द राष्ट्राध्यक्षाची निंदा? त्याच्यावर चहाड बोचऱ्या जिभांचे विखारी हल्ले? हरहर! अध्याक्षामागे एकदिलाने राज्य उभे हवे. ही राष्ट्रघातकी प्रवृत्ती आम्ही सहन करणार नाही! लोकापवादातून सुटण्यासाठी, खुनाच्या चौकशीसाठी अर्ल ऑफ वॉरेनला तो नेमतो. अर्ल या भलत्याच जोखमीने कातावून म्हणतो, हा दैवा! कोणी मला न्याय देण्यासाठी जन्मास घातले? मॅकबर्ड लागलीच म्हणतो, तुमची चुकीची समजूत झालेली दिसते. न्यायदानासाठी आम्ही या खेपेस तुम्हाला नियुक्त केलेले नाही. अर्ल म्हणतो, मी चुकलोच. संशयनिवृत्तीसाठी मी नेमला गेलो आहे. मॅकबर्ड म्हणतो, आता तुमच्या ध्यानी काय ते अचूक आले, अर्लमहाराज! अर्ल प्रथम या कृष्णकृत्यात भागीदार होण्याचे नाकारतो, पण मॅकबर्ड त्याला भाग पाडतो. नवा अध्यक्ष म्हणून पत्रकारांपुढे भाषण करतो त्यात केन-ओ-डंकचीच उच्च स्वरातली सुंदर सुंदर शब्दकळा थोडक्या बदलांनी वक्तृत्वपूर्ण शैलीत बोलतो. 'न्यू फ्रॉंटिअर' ऐवजी 'स्मूथ सोसायटी–' नितळ समाजाचे स्वप्न मांडतो. सगळे राज्य म्हणजे एकसारखी कापून जोपासलेली शिस्तबद्ध आणि वैभवशाली बाग! या स्वप्नात तो रंगला आहे तो 'व्हिएत–लॅंड'मधल्या यादवीचा सवाल येऊन पडतो. उद्याच्या सूर्योदयाच्या आत ही पृथ्वीच्या पाठीवरची पटकीच्या साथीसारखी अनिष्ट यादवी निकालात काढा, अशी आज्ञा मॅकबर्ड लॉर्ड मॅक्नमारा या सरदारास सोडतो. परंतु ही यादवी उत्तरोत्तर भडकतच जाते आणि मॅकबर्डला हैराण करते; अखेरी त्याच्या सर्वनाशास कारणीभूत होते.

हा अर्थात् झाला पुढला कथाभाग; दुसऱ्या अंकाच्या या दुसऱ्या प्रवेशात 'मॅकबथ'ची सरळसरळ आठवण देणारा लेडी मॅकबर्डचा एक सुरेख पोट-प्रवेश आहे. सर्वभर तिला रक्ताचा दर्प येतो आहे आणि हरप्रकारांनी तो नाहीसा करण्याचा एकच ध्यास तिला लागला आहे. दूर जा, गलिच्छ दर्पा दूर जा–असे ती एकसारखी म्हणते. तिच्या या वेडसर अवस्थेने सगळेच बेंड बाहेर फुटेल या आशंकेने मॅकबर्ड चांगलाच बेचैन होतो. तेवढ्यात येऊन सरदार मॅक्नामारा व्हिएतलॅंडमधल्या चिघळत्या संघर्षातील नव्या गुंतागुंतीची खबर त्याला देतो आणि काहीसा उद्विग्न मॅकबर्ड उसासून म्हणतो, या तमाशाचा उबग येऊ लागला आहे आता आम्हाला! वाटते की आमच्या राज्याला आमची एवढी मोठी गरज नसती तर फार फार बरे झाले असते!

इकडे पुढच्या तिसऱ्या प्रवेशात दोघे केन-ओ-डंक बंधू त्यांच्या जिवावर बेतणाऱ्या आणि पूर्वनियोजित वाटणाऱ्या एकेक भयंकर अपघातांतून कसेबसे बचावत मॅक्‌बर्डला उलथण्याचा बनाव रचताना दिसतात. इथेच दुसऱ्या अंकाचा पडदा येतो.

तिसऱ्या अंकात राज्याची अंतर्गत परिस्थिती आणि व्हिएत-लँडमधला चिघळणारा संघर्ष या कात्रीत मॅकबर्ड वाढत्या प्रमाणात पुरता सापडतो. दूत येऊन धापा टाकीत ताज्या बातम्या देऊ लागतात. शांतता-निदर्शकांचे मोर्चे निघताहेत. मॅकबर्ड म्हणतो, रोखून धरा ! बीटनिक्स सक्तीच्या लष्करभरतीची कार्डे जाळीत आहेत. मॅकबर्ड ओरडतो, जेलमध्ये फेका त्यांना ! निग्रोंनी सत्याग्रह आरंभला. मॅकबर्ड किंचाळतो, अश्रुधूर सोडा त्यांच्यावर ! लॅटिन बंडखोरांनी उठाव केला. मॅकबर्डची आरोळी, गोळ्या घाला लेकाच्यांना ! आशियातले शेतकरी शस्त्रसज्ज होऊ लागले. मॅकबर्डची डरकाळी, बॉम्ब फेका त्यांच्यावर ! दूत शेवटी सांगतो. लोकसभेतले सदस्य बोंबलताहेत. यावर मॅकबर्ड चक्क फुल्याफुल्यांची एक बीभत्स आज्ञा करतो. वर म्हणतो, राष्ट्राध्यक्षाच्या आज्ञेचा भंग म्हणजे राजद्रोह ! पण त्याला वाटू लागते, हरे राम ! सर्वांनीच मला अंतर दिले की काय ? त्याची झोप उडते, त्यात लेडी मॅकबर्ड तिच्या रक्ताच्या भासाने भर घालते. मॅक्बेथप्रमाणे या मॅकबर्डला त्या तीन ' हडळीं 'ची गाठ घेऊन या साऱ्याचा अर्थ जाणून घेण्याशिवाय मार्ग राहत नाही. पुढल्या प्रवेशात तो त्यांना गाठतो आणि त्याला ते त्याचा अंतिम सर्वनाश समीप आल्याचे हेरून बदसल्ला देतात. ते सांगतात, मॅकबर्ड, धीट, निर्धारयुक्त राहा. रक्तपाताचीसुद्धा फिकीर करू नकोस. सावध म्हणतील त्यांचे ऐकू नकोस. तुझ्या सिंहासनास हात लावण्याची या जगात कोणाची हिंमत नाही. वॉशिंग्टनमध्ये लाकडे जळेपर्यंत तुला आता परमेश्वराचीही भीती नाही.

हे लाकडे जळण्याचे काय प्रकरण ते मॅकबर्डला कळण्याच्या आत हडळी अंतर्धान पावतात. परंतु तो आता असल्या सूचना विचारात घेण्याच्या अवस्थेतच नसतो. प्रतिपक्ष—' केन—ओ—डंक ' बंधूंचा—आपले बळ एकवटत असतो. एक सीनेटर वर्णन करतो, रॉबर्टच्या नेतृत्वाखाली उदारमतवादी शक्ती समीप येऊन ठाकल्या आहेत. बिनीला पूर्वेकडील उद्योगपती आणि बँकवाले हजर आहेत. यूनियनवाले शिस्तीने चालून येत आहेत. नीग्रोंच्या पलटणी पिछाडी राखीत आहेत. मॅकबर्डचे नाव पुन्हा अध्यक्षपदासाठी सुचविण्यात आले यानेच तो उन्मत्त झाला आहे. परंतु त्याचा पाठिंबा क्षणोक्षणी घटत आहे. आणि वॉशिंग्टनला मोठी आग लागते. ' वाशिंग्टनमध्ये लाकडे जळेपर्यंत ' या हडळींच्या शब्दांचे स्मरण मॅकबर्डला होते आणि आपला सर्वनाश समीप दिसतो, परंतु आता तो सावरण्यापलीकडे बेफाम झालेला असतो.

[पृष्ठ ६४ वर]

# राजकीय स्वैंपाक-घरातील नवे रुचकर पदार्थ



हल्ली बायका गृहिणी वगैरे बनू लागल्या आहेत. पूर्वी असे नव्हते. तेव्हा स्त्रिया उपजत गृहिणी असत. आता लग्न झाल्यानंतर का होईना पण त्या ही पदवी घेण्यासाठी धडपडतात ही आनंदाची गोष्ट आहे. नवरा हापिसातून परत आल्या-नंतर त्याला चहापूर्वी एखादा नवा पदार्थ खाऊ घालणे ही गोष्ट तितकीशी काही वाईट नाही, हे आता अनुभवाने पटू लागलेले आहे. अशा महिलांच्या सोईसाठी मासिकांतून, वर्तमानपत्रांच्या साप्ताहिक आवृत्त्यांतून 'आठवड्याचा ताजा पदार्थ' प्रसिद्ध होत असतो. बायका त्या करीत असतात काय, आणि त्यांचे नवरे तो पदार्थ खातात काय हे अद्यापि समजलेले नाही. पण सुगरण महिला दर आठवड्याला नवा पदार्थ शोधून काढतात आणि तो छापायला देतात, ही कौतुकाची गोष्ट आहे.

आपल्या हिंदुस्थानच्या राजकारणातही अनेक 'राजकीय महिला' असे नित्य नवे पदार्थ तयार करीत असतात. सुगरण पुढाऱ्यांच्या माहितीसाठी काही विशेष खमंग पदार्थांची माहिती खाली दिली आहे.

## स्वतःच्या पक्षाचा चिवडा

आपला पक्ष घ्यावा. त्यातील कार्यकर्त्यांत बौद्धिक मारामारी घडवून आणावी. दोन्ही बाजूस चारदोन-चारदोन कार्यकर्ते असले तरी पुरे. सोईसाठी त्यांना डावे उजवे हे नाव द्यावे. अध्यक्ष, कार्यवाह इत्यादी जागांसाठी भांडणे होतील अशी व्यवस्था करावी. ताबडतोब आपल्या पक्षाचा चिवडा तयार होतो. या चिवड्यात सत्तेसाठी नव्यानेच प्रवेश केलेले बेदाणे, आरामखुर्चीत बसून नुसतीच चर्चा करणारे काजू, दुसऱ्याला फटाफट बोलून ठसका लावणाऱ्या मिरच्या घालाव्यात. मग हा चिवडा खाण्यास फारच खमंग लागतो. या चिवड्याचे वैशिष्ट्य हे आहे की चिवड्याबरोबरच तो तयार करणाराही संपतो. खाणारे मात्र फार स्तुती करतात.

## सर्व पक्षांचे कडबोळे

काय करावे, म्युनिसिपालिटी, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधानसभा– जो पदार्थ हाताशी लागेल तो घ्यावा आणि तेथील निवडणुका लढवाव्यात. सत्तारूढ

पक्षाला खूप शिव्या द्याव्यात आणि विरोधकांची संयुक्त आघाडी काढून जनतेला भरघास आश्वासने द्यावीत. म्हणजे मग निवडणुकीत कोणालाच बहुमत मिळत नाही. मग सगळ्या विरोधी पक्षांचे पीठ एकत्र करून मळावे. ते वरवर एकजीव झाले तरी पुरे. फार मळूच नये. या पिठात संयुक्त जाहीरनामा, जनतेचे दडपण इत्यादी तिखटमीठ टाकावे. सत्तेच्या तेलात तळले की छान कडबोळी तयार होतात. हे तेल मात्र बेताबेताने वापरावे. कारण, जितके तळाल तितके ते पिठात मुरतेच. जास्त मुरले तरी चिंता नाही. कडबोळी अधिकच खुसखुशीत होतात. मात्र ही कडबोळी फारच थोडा वेळ टिकतात. ताजीताजी असेपर्यंत फार रुचकर लागतात. शिळी झाल्यावर त्यांची चव कडवट लागते. काही वेळा पोटातही दुखू लागते. म्हणून अधूनमधून पण थोडीथोडी कडबोळी केल्यास उत्तम !

## पार्टीची चटणी

आपल्या पार्टीतले निवडक शेंगदाणे घ्यावेत. जिकडे तिकडे तिखटजाळ, जहाल भाषणांची राळ उडवून द्यावी. अल्पसंख्य मुसलमान, ख्रिश्चन यांच्या मागण्यांना नेहमी पाठिंबा देत असावे. प्रांतभेद, भाषाभेद यांच्या जाळावर सगळे दाणे भाजून घ्यावेत. एवढ्यानेही भागले नाही आणि दाणे कच्चेच राहिले आहेत असे वाटले तर चीन, रशिया, पाकिस्तान यांना पाठिंबा देणारी वक्तव्ये करावीत. सगळीकडे आग पेटवावी. या आगीत निवडक दाणेच काय सबंध पार्टीच चांगली भाजून निघते आणि लोक या पार्टीचे कूट करून चटणी उडवतात. ही चटणी एका पार्टीची फक्त एकदाच होऊ शकते. प्रयोग करून पाहावे.

## जनतेचा खिमा

जिल्हा परिषद, सहकारी सोसायट्या, सहकारी बँकात घुसावे. जमेल तेवढा पैसा उकळावा. वाटेल तशी आश्वासने तोंड भरून द्यावीत. विश्वासाने मान खांद्यावर टाकतील त्यांचे गळे धडाधड चिरावेत. नोकऱ्या लावण्यासाठी, बदली करण्यासाठी प्रत्येकाकडून कमिशन घ्यावे. मदत म्हणून मिळालेल्या प्रत्येक वस्तूत आपला हिस्सा ठेवावा. गोरगरिबांना जातीची शपथ घालावी. गुंडांना पैसा वाटावा असे काही वर्षे केल्यास ताबडतोब तेथील जनतेचा खिमा होतो. हा पदार्थ 'नॉन्व्हेज' असला तरी चवीला उत्तम आहे. मात्र तो खर्चिक असल्यामुळे वरिष्ठ वर्गातल्या श्रीमंतांनाच तो करणे शक्य आहे. गरिबांनी या भानगडीत पडू नये हे बरे. या पदार्थाचे वैशिष्टय हे आहे की, खिमा तयार करणारा इसम स्वतः जितका खमंग असेल तितकी तितकी या खिम्याची चव रुचकर बनते. निरनिराळ्या ठिकाणच्या जनतेचा निरनिराळ्या पद्धतीचा खिमा होतो तो याच कारणामुळे.

## पुढाऱ्याच्या पाठीचे धिरडे

हाच खिमा बिघडल्यास हा पदार्थ तयार होतो. लोकांना या खिम्याची आधीच

कल्पना आली तर ते खवळतात. तो करणाऱ्या पुढाऱ्याला धरतात आणि बडव बडव बडवतात. इतके की, त्याच्या पाठीचे झकास धिरडे होते. हाही पदार्थ तसा खाण्यास बरा आहे. मात्र जरा त्रासाचा आहे. केव्हातरी दहावीस वर्षांतून एकदा करण्यास हरकत नाही. मोठ्या पाठीच्या पुढाऱ्याचे धिरडेही मोठे होते व ते पुष्कळ दिवस टिकते.

## शिक्षणसंस्थेचे खोबरे

एखादी शिक्षणसंस्था काढावी. तिच्या अध्यक्षपदी आणि संचालक मंडळात गावातले पुढारी घ्यावेत. रिकामटकडे, गुंड ही मंडळीही घेता आली तर उत्तमच. पण निदान चेअरमन आणि सेक्रेटरी तरी राजकीय पुढारी असावेत. हेडमास्तर किंवा प्रिन्सिपॉलच्या जागेवर आपल्या जातीतला शक्य तितका नालायक मनुष्य आणून बसवावा. शाळेतले शिक्षक किंवा कॉलेजातले प्रोफेसरदेखील शक्य तो जात बघूनच घ्यावेत. मुलांची फी, इमारत फंड, सरकारी ग्रँट यातून मिळालेले पैसे निवडणुकीच्या कामासाठी वापरावेत. शिक्षक–प्राध्यापक, मुले यांना आपल्या पक्षाच्या निवडणुकीच्या वेळी प्रचारासाठी भरपूर राबवावे. मग शिक्षणसंस्था काही दिवस बंद राहिली तरी चालेल ! पुढाऱ्यांची, टोळभैरवांची सगळी नापास कार्टी दरवर्षी नेमाने वर चढवावीत. जमेल त्या त्या वेळी संस्थेत जाऊन शिक्षकांना दम तरी भरावा किंवा देशभक्तीवर व्याख्याने तरी झोडावीत. आपल्यापैकी एखाद्या मुलास शिक्षकाने चुकून मारले तर त्या शिक्षकास शाळेत जाऊन बेदम चोपण्यास हरकत नाही ! असे काही वर्षे केल्यास लवकरच शिक्षणसंस्थेचे, शिक्षणाचे इतकेच नाही तर मुलांचेही खोबरे होते, त्याची चव विशेष मधुर लागते.

## राष्ट्रीय गुलाबजाम

ऊन, पाऊस, वारा, गरिबी यांचा स्पर्शही न झालेली खव्यासारखी गुलगुलीत माणसे घ्यावीत. माजी संस्थानिक, जहागिरदार, बागाईतदार, शेतकरी, सरकारी ठेकेदार, उद्योगपती यांच्यांतून अशी माणसे मिळणे फारसे कठीण नाही. त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देऊन मोठमोठी अधिकारस्थाने द्यावीत. त्यांच्या पैशाने निवडणुकी जिंकून सत्ता ताब्यात घ्यावी. मग या मंडळींना प्रथम सभापती, मग आमदार, त्यानंतर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, नंतर मंत्री अशा एकापेक्षा एक बड्या जागा सतत देत राहावे. मोटारीशिवाय ते कोठेही चार पावले हिंडणार नाहीत याची काळजी घ्यावी. लवकरच त्यांच्या मोटारींची आणि बंगल्यांची संख्या वाढते. त्यांची मुले परदेशांत शिकायला जातात. सगळे नातेवाईक मोठमोठ्या हुद्द्यावर चढतात. काही वर्षांतच ही खव्यासारखी माणसे गलेलठ्ठ होत होत गुलाबजामसारखी लालबुंद आणि गरगरीत होतात. सत्तेच्या तुपात तळून पैशाच्या पाकात बुडवून ठेवल्यावर हे गुलाबजाम फारच सुंदर दिसतात. हल्ली पांढऱ्या गुलाबजामची

विशेष फॅशन आहे. म्हणून शुभ्र खादीच्या आवरणात हे गुलाबजाम गुंडाळून ठेवल्यास त्यांचे सौंदर्य विशेष खुलून दिसते. हल्ली जिकडेतिकडे हा पदार्थ दृष्टीस पडतो. अगदी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत. म्हणून या पदार्थास ' राष्ट्रीय गुलाबजाम ' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही मागणी नसली तरी या गुलाबजामची सारखी निर्याताचालू असते.

## सबंध देशाचे वांगे

सबंध भरली वांगी आपल्या परिचयाची आहेतच. त्यांची चव किती खमंग असते ! असेच वांगे संपूर्ण देशाचेही करता येते. काय करावे—बहुसंख्य समाज घ्यावा आणि त्याची चांगली कणीक तिंबावी. त्याला एकसारखी नावे ठेवावीत. अल्पसंख्य समाजाचे मात्र एकसारखे लाड करावेत. देशातील लढाऊ वृत्ती चांगलीच खच्ची करावी. कोठेही कुणी प्रतिकाराचा शब्द उच्चारणार नाही अशी दक्षता घ्यावी. सरकारी कारभारात रेमेडोके मंत्री आणावेत. जिकडेतिकडे अनास्था, बेपर्वाई, बेजबाबदारपणा या गुणांचा विकास करावा. लाचलुचपतीस रान मोकळे सोडावे, वशिलेबाजीची फोडणी टाकावी, देशापेक्षा पक्ष मोठा, पक्षात आपला गट महत्त्वाचा आणि त्यातही आपण श्रेष्ठ ही भावना पद्धतशीरपण जोपासावी. शत्रूने हल्ला केल्यास मुकाट्याने शरण जाऊन रदबदली करावी. तडजोडीसाठी आपल्या देशाची भूमी खुशाल दान म्हणून देऊन टाकण्याची सवय अंगी बाणवावी. खर्चाला कसलाही ताळमेळ ठेवू नये. वेळ आलीच तर आपल्या चलनाचे अवमूल्यन करून आर्थिक क्षेत्रात बोंबाबोंब उडवून द्यावी. मुख्य म्हणजे तज्ज्ञ, माहीतगार या प्राण्यांना तुच्छ लेखावे. त्यांचा सल्ला कधीही एकू नये. असे पंधरावीस वर्षे केल्यास संपूर्ण देशाचे वांगे आपोआप होते. याची चव आपली आपल्याला घेता येत नाही. पण परदेशी लोकांना नेहमीच असली वांगी आवडतात. मात्र सत्तेवर असलेल्या पक्षालाच देशाचे असे संपूर्ण वांगे करता येईल.

राजकीय स्वैंपाकघरात तयार होऊ शकणारे काही पदार्थ आम्ही सुचवले आहेत. हे सगळेच पदार्थ सगळयाच सुगरण पुढाऱ्यांना वा पक्षांना जमतील असे नाही. काही विशेष खर्चिक आहेत तर काहींसाठी बराच वेळ आणि श्रम लागतात. पण प्रयत्न केल्यास कठीण काही नाही. ज्याला जे जमेल ते त्याने करून पाहावे. याबाबतीतील आपले अनुभव आम्हास कळविल्यास या पदार्थात आणखीही सुधारणा करता येईल. हे पदार्थ आवडल्यास आणखी काही असेच खमंग व रुचकर पदार्थ कसे बनवावेत हे आम्ही प्रात्यक्षिकासह सांगू, त्यासाठी राजकीय पुढाऱ्यांचे एखाद्या थंड हवेच्या ठिकाणी शिबिर भरविण्याचाही आमचा इरादा आहे. ○

# नेपाळ

खूप वर्षे झाली त्या गोष्टीला. निळ्या निळ्या डोंगरांनी वेष्टिलेल्या प्रदेशात एक खूप मोठ्ठं सरोवर होतं. अतिशय रमणीय अन् पवित्र प्रदेश होता तो. महान ऋषि-मुनी त्या सरोवराच्या तीरावर आश्रम बांधून तपःसाधना करीत होते. या भूभागाचे भवितव्य मोठे उज्ज्वल असल्याचं भविष्य त्यांनी वर्तविलं होतं. अशा या महान तपोभूमीत एके दिवशी एका थोर व्यक्तीने पाय ठेवला. ती व्यक्ती म्हणजे बोधिसत्त्व मंजुश्री. उत्तरेकडील मोठमोठे पहाड पार करून आपल्या अनुयायांसह तो इथे उतरला. त्याला तो रम्य परिसर फार आवडला. पण सरोवराने एवढी मोठी जागा व्यापली होती की, वस्तीला सपाट प्रदेश उरलाच नव्हता. मग त्याने काय केलं, आपली तलवार उचलली आणि दक्षिणेकडच्या पहाडावर मोठा घाव घातला. पहाड दुभंगले आणि सरोवराचे पाणी खळखळा वाहू लागले आणि दूर मैदानात संथ वाहणाऱ्या गंगेला जाऊन मिळाले. तोच बागमती नदी आणि पाणी

| अन्नपूर्णा आणि धवलगिरी | लेखांक | तीन |

वाहून गेल्याने जो सपाट प्रदेश वस्तीला लायक असा बनला तेथेच वसले आहे हल्लीचे काठमांडू, नेपाळची राजधानी.

नेपाळमध्ये लोकवस्तीस सुरुवात ही अशी झाली अन् या आख्यायिकेला दुजोरा मिळतो तो अगदी अनपेक्षित ठिकाणी-इतिहासात नव्हे तर भूशास्त्रात (Geology). भूशास्त्रज्ञांच्या मते काठमांडू, पोखरा या विशाल दऱ्यांमध्ये पूर्वी मोठाली सरोवरे होती हे नक्की. लाखो वर्षांपूर्वी हिमालयाच्या ठिकाणी टेथिस नावाचा समुद्र होता. उत्तरेस आणि दक्षिणेस दोन प्रचंड भूखंडांनी त्याला वेढून टाकलं होतं. हे दोन भूखंड स्थिर नव्हते, तर हळूहळू ते एकमेकांकडे सरकत होते आणि मधल्या सागराला दाबून टाकीत होते. या प्रचंड दाबामुळे समुद्र निरुंद होत चालला आणि त्याच्या तळभागास घड्या पडू लागल्या. उत्तर बाजूकडील तळभाग दुमडून वर उचलला गेला आणि तिबेटचे पठार निर्माण झाले. या पठारावर उगम पावणाऱ्या

# एक हिंदुराष्ट्र



नेपाळमधील पहाडीप्रदेशात उंचावर असलेल्या एका बौद्ध मठात चालू असलेला हा धार्मिक समारंभ. संध्याकाळी प्रार्थनेने सुरू होणारा हा समारंभ दुसऱ्या दिवशी सकाळी संपतो. रात्री नाच-गाणी, खाणे-पिणे मोठ्या आनन्दात चालते............

प्रकाश गोळे

नद्या दक्षिणेकडील समुद्रास मिळत होत्या. या नद्यांनी दक्षिणेकडे जाताना डोंगर पोखरून खोल अशा घळई निर्माण केल्या. पण भूखंडांची हालचाल सुरूच होती. सागराचा तळभाग वरवर उचलला जात होता. ही हालचाल झाल्यामुळे कित्येक ठिकाणी या नद्यांच्या मार्गात पर्वतांचे बंधारे उभे ठाकले आणि नद्यांच्या प्रवाहांच्या ठिकाणी सरोवरे निर्माण झाली. ही हालचाल कोटयवधी वर्षे सुरू होती आणि नद्यांना अडविणाऱ्या महाभारत पर्वता(महाभारत लेख)च्या रांगांची उंची अजूनही वाढत आहे. सुमारे दोन लाख वर्षांपूर्वी काठमांडूच्या जागी पूर्वी असलेले सरोवर आटून गेले. त्यानंतरही या पर्वतांची उंची २०० मीटर वाढलेली आहे.

## ने मुनीची भूमी

नेपाळच्या इतिहासात प्रथमपासूनच या प्रशस्त जागेला अनन्यसाधारण महत्त्व लाभलेलं आहे. इतकं की, "नेपाळ व्हॅली" असं याच जागेला संबोधतात. हें नेपाळ नाव कसं पडलं, याबद्दलही एक गमतीदार आख्यायिका प्रचलित आहे.

हिंदुस्थानात दिग्विजयी गुप्त सम्राट राज्य करीत होते, त्या वेळची गोष्ट. ने मुनि नावाचा एक तपस्वी गुप्त वंशातील एका राजपुत्राला बरोबर घेऊन या भागात आला. आपल्या तप:साधनेच्या बळावर त्याने येथील मूळच्या रहिवाशांना आपलेसे करून टाकले. त्याची कीर्ती एवढी पसरली की, तेथील लोकांनी तो राहात असलेल्या या भूमीला त्याचेच नाव देऊन टाकले—नेपाल, ने मुनीने संगोपन केलेली भूमी. त्याच्याबरोबर आलेल्या राजपुत्रास या मुनीने गादीवर बसविले आणि या राजवंशानेही 'नेपाल' हे नाव कायम केले.

ने मुनीने ज्यांना आपलेसे केले ते रहिवासी कोण? ते नेपाळचे मूळचे रहिवासी का? होय आणि नाहीही! कारण, नेपाळमध्ये तराईच्या जंगलात आजही असे लोक राहतात की जे अजूनही आदिमानवाच्या काळात वावरत आहेत—निग्रॉईड वंशाचे थारू टोळीवाले. भारतात जसे निग्रॉईड वंशाचे टोळीवाले आदिवासी अजूनही आहेत, त्यांचेच हे भाईबंद. मग ने मुनीला भेटलेले हे लोक कोण? कोठले? त्यांचे नाव 'नेवार.' स्वत:ला मंजुश्री बोधिसत्त्वाचे वंशज म्हणवितात ते अन् त्याच आख्यायिकेत ते कोठून आले, हे दिलेलं आहे. मंजुश्री आला, चीनच्या—तिबेटच्या बाजूने, म्हणजे नेवारांचे पूर्वज होते मंगोलियन वंशाचे.

काठमांडू आणि आजूबाजूचा प्रदेश यामध्ये वस्ती आहे मुख्यत: नेवारांची. पश्चिम नेपाळमधील ज्या प्रमुख शहरी—पोखऱ्याला—आम्ही वाटेत थांबलो होतो, त्या शहराची भरभराट नेवारांमुळेच झालेली आहे. पोखऱ्याचा परिसर हा खरा 'गुरुंग' जमातीचा प्रदेश. हे 'नेवार', 'गुरुंग' हे लोक आहेत तरी कोण? नेपाळमध्ये राहणाऱ्या निरनिराळ्या जमातींचे विहंगमावलोकन केल्याशिवाय पुढे प्रवासाला निघणे योग्य होणार नाही.

नेवारांचे पूर्वज तिबेटकडून आले असावेत या म्हणण्यास अधिक आधार म्हणजे

त्यांची भाषा. तिबेटी भाषेशी तिचे बरेच साम्य आहे. पण काठमांडू व्हॅलीत लोकांची ये-जा बरीच. भारतातून गुप्तकाल किंवा त्याच्याही पूर्वी हिंदू लोक तेथे गेले होते. मध्ययुगातील मल्ल या राजघराण्याने तर बौद्ध धर्माचे उच्चाटन पद्धतशीरपणे करण्याचा चंग बांधला होता. यामुळे मूळच्या नेवार रक्तात हिंदू रक्ताची बरीच सरमिसळ झाली. अजूनही शिवभक्त हिंदू नेवार आणि बुद्धभक्त नेवार असे पंथ त्यांच्यात आहेत. पण हिंदूधर्माचा प्रभाव असा, की आपली वर्ण-व्यवस्था बुद्धधर्मीयही पाळतात. त्यांच्यातही ब्राह्मण आहेत, क्षत्रिय आहेत. मात्र हिंदू-बौद्ध असा फरक आपण करायचा. सामान्य नेपाळीला तो फरक क्वचितच जाणवतो. या ' रिलिजस् टॉलरन्सचे ' युरोपीयांना फार आश्चर्य वाटते. काठमांडू येथील स्वयंभूनाथाच्या मंदिरात बुद्ध, ख्रिस्त आणि गांधी या तिघांच्या प्रतिमा कशा काय बुवा ? असा प्रश्न त्यांना पडतो.

सामान्यतः नेपाळी राष्ट्राची ख्याती ' लढवय्ये लोकांचे राष्ट्र ' अशी आहे. पण नेवारी लोक शांतताप्रिय, कलावंत, साहित्यिक म्हणून प्रसिद्ध. नेपाळमधील लाकडा-वरचे सुप्रसिद्ध कोरीव काम नेवाऱ्यांच्या कुशल हातातून उतरलेले. असे म्हणतात की बौद्ध मंदिरातील ' स्तूप ' (पॅगोडा) शैली ही त्यांचीच कारागिरी. नेवारी कारागिरांना तिबेट व चीनमध्ये नेहमीच मागणी असायची. त्या कारागिरांनी ही शैली तिबेटमध्ये व तेथून पूर्व व दक्षिण–पूर्व आशियात प्रचलित केली.

पोखऱ्याला नेवारी कसे ? याचे उत्तर म्हणजे नेवारी हे व्यापारी म्हणूनही प्रसिद्ध आहेत. त्यामुळे नेपाळच्या सर्व भागात ते पसरलेले आहेत. व्यापारवृद्धीत आणि त्याचबरोबर राज्यकर्त्यांना नको असलेल्या ' लोकशाही, समाजसत्तावाद ' असल्या कल्पना प्रसृत करण्यातही पुढाकार त्यांचाच.

पण ' नेपाळचे मूळचे रहिवासी हा मान खरा आमचा, नेवारांचा नव्हे ' असे म्हणणारे लोकही आहेतच. ते म्हणजे नेपाळची पूर्व सीमा सिक्कीमपासून जवळजवळ काठमांडूपर्यंत पसरलेले किरान्ती लोक. महाभारतातील सुप्रसिद्ध ' किरात ' लोकांचे वंशज. हे लोकही मंगोलियन वंशाचेच. भीम–अर्जुनांना किरातांशी सामना देण्याचे प्रसंग आले होते. इ. स. पू. ७०० पासून इ. स. च्या पहिल्या शतकापर्यंत त्यांनी नेपाळमध्ये राज्य केले. गुप्तकालातील सुप्रसिद्ध लिच्छवी घराणे किरातीच.

लिम्बू आणि राय लोक हे किराती लोकांचे आजचे वंशज. काठमांडूपासून अरुण नदीपर्यंत राय व आणखी पूर्वेकडे राहतात लिम्बू. दोन्हीही जमाती शौर्यासाठी प्रसिद्ध. त्यामुळे ब्रिटिश आणि हिंदी सैन्यात भरती झालेले. पुरुष शौर्यासाठी तर स्त्रिया सौंदर्यासाठी प्रसिद्ध. पुरुष सैन्यात गेल्यामुळे कुटुंबाचे उत्पन्न चांगले, शिवाय ते राहतात तो प्रदेश सुपीक, भरपूर पावसाचा, वर्षातून तीन पिके काढण्यायोग्य. त्यामुळे इतर नेपाळी जमातींपेक्षा जीवनमान उच्च.

वधू निवडण्याची या लोकांची पद्धत आहे मोठी काव्यमय. जो तरुणी ज्याला

आवडली असेल त्या तरुणीस किराती तरुण स्वत: रचलेले काव्य पेश करतो. ते ऐकून ती त्याला काव्यातच उत्तर देते आणि कोडे टाकते. ते कोडे जर त्याला सोडविता आले तर त्याने तिला जिकले. हे सवाल–जवाब सर्वांसमक्ष चालतात. आता प्रथमदर्शनीच मियाँ–बिबी राजी झाले असतील तर सोपं कोडं त्याच्या वाट्याला येते, किंवा त्याच्या काव्याला प्रत्युत्तर देणे लाजून टाळलं जातं. अलिकडे मात्र ही चाल मागे पडू लागली आहे. नेपाळ आधुनिक बनू लागला आहे.

पूर्व नेपाळमध्ये उंच डोंगरात राहणारी एक छोटी जमात सुप्रसिद्ध आहे. हिमालयीन मोहिमा आणि गिर्यारोहण यांच्या संबंधात त्या जमातीचे नाव नेहमी ऐकू येतं. एव्हरेस्टच्या परिसरात राहणाऱ्या या लोकांचे नाव 'शेरपा'. तिबेटी वंशाचे, शूर आणि स्वतंत्र बाण्याचे लोक. हिमालयीन मोहिमांच्या जमान्यापूर्वी तिबेटबरोबर व्यापार हा त्यांचा मुख्य उद्योग. व्यापारामुळे आणि सध्या हिमालयीन मोहीमांमध्य मिळणाऱ्या भरपूर पगारामुळे एकूण हे लोक सघन. धर्म तिबेटी-बौद्ध पण हिंदू आचार व देवतांचे चमत्कारिक मिश्रण झालेले. बहुपतित्वाची चाल शेरपांमध्ये रूढ असण्याचे कारण त्यांच्यातील पुरुषांचे देशाटन हेच असावे. एका बाईने भावाभावांशी लग्न करण्याची चाल. त्यामुळे एखादा नवरा तरी घरी राहण्याची शक्यता जास्त. पण शेरपा लोक आहेत किती !, १९६१ साली एव्हरेस्ट शिखराच्या पायथ्याशी असलेल्या खुम्बू व्हॅलीत फक्त २२०५ शेरपा लोक होते !

एव्हरेस्ट पर्वताच्या पश्चिमेस अनुक्रमे गौरीशंकर आणि लांगटांग पर्वतांच्या रांगा पसरल्या आहेत आणि त्याही पलिकडे आहे गणेश पर्वत. गणेश पर्वताच्या उतारांवर राहणाऱ्या जमातीचे नाव थमांग. हे लोकही मंगोलियन वंशाचे, तिबेटच्या अंतर्भागातून आलेले. जादूटोणा, पिशाच्चे यांनी भरलेला त्यांचा धर्म. बुद्ध धर्माचा प्रभाव कमीच. थमांग लोकांचे धर्मगुरू निराळे आहेत. आपला जुना 'बों' धर्म आणि तिबेटी बौद्ध धर्म यांचे त्यांनी चमत्कारिक मिश्रण बनविले आहे. काठमांडू आणि दक्षिणेकडे तराईत ज्यांनी स्थलांतर केले आहे असे थमांग तिबेटी रक्ताचे उरलेले नाहीत. इतर अनेक जमातींशी व हिंदूंशी त्यांनी संबंध जोडलेले आहेत.

गणेश पर्वताच्या पश्चिमेस अनुक्रमे मनासलू आणि अन्नपूर्णा या दोन सव्वीस हजार फुटांहून अधिक (८००० मीटरपेक्षा जास्त) उंचीच्या पर्वतांच्या रांगा आहेत. मरस्यमी आणि कृष्ण गंडकी या नद्यांनी सीमित केलेल्या या प्रदेशात गुरुंग लोक राहतात. पोखरा शहर याच भागात आहे. त्याही पलिकडे पश्चिमेस धवलगिरी पर्वताच्या पश्चिम व दक्षिण उतारावर, कर्नाली नदीच्या खोऱ्यात राहतात मगर लोक. गुरुंग आणि मगर लोक नेपाळच्या अगदी जुन्या रहिवाशांपैकी. गुरुंगांच्या चेहऱ्याची ठेवण मंगोलियन तर पश्चिमेकडे राहणाऱ्या मगरांचा संबंध गढवाली हिंदूंशी जास्त आलेला. त्यामुळे नेवारांशी अधिक मिळतीजुळती ठेवण चेहऱ्याची. उत्तुंग पर्वतांच्या परिसरात राहणारे हें लोक आहेत मोठ्या उमद्या वृत्तीचे,

आनंदी आणि प्रसंगी मिस्किलही. स्त्रिया सुंदर—आधीच सुबक असलेल्या चेहऱ्यावर खेळणाऱ्या स्मितहास्यामुळे व्यक्तिमत्त्व विशेषच आकर्षक झालेलं. पुरुष रुंद खांद्यांचे, बळकट हाडापेराचे आणि उल्हसित वृत्तीचे. पुष्कळसे सैन्यात भरती झालेले. कसतात ती जमीन सुपीक त्यामुळे राहणी बऱ्यापैकी. मगर लोक चांगल्यापैकी कारागीर म्हणूनही प्रसिद्ध. विशेषत: लोहारकाम चांगले करतात. पूल बांधण्याच्या कामातही सराईत. तिबेटातून मीठ आणण्याचा व्यापरही करीत, पण आता तो बंद झाला आहे.

## गुरखा जमात कुठली ?

नेपाळ हे राष्ट्र गुरख्यांचे. पण आतापर्यंत गुरखा जमातीचा उल्लेख कोठेच आलेला नाही. तसं म्हटलं तर गुरखा हा शब्द चुकीच्या अर्थाने वापरण्यास सुरुवात केली ब्रिटिशांनी. सैन्यात भरती झालेल्या सर्वच नेपाळी लोकांना ते गुरखा संबोधत. सैन्यात भरती होणारे लोक आहेत मुख्यत: लिम्बू आणि राय किंवा मगर आणि गुरुंग. पण गुरखा ही स्वतंत्र जमात नाही असं नाही. पण हे लोक स्थलांतरित. पद्मिनीप्रसिद्ध अल्लाउद्दीनाने जेव्हा चितोड व इतर रजपूत राज्ये जिंकली तेव्हा पुष्कळसे रजपूत देशोधडीला लागले. फिरत फिरत ते नेपाळात येऊन स्थायिक झाले. काठमांडूच्या पश्चिमेस त्यांनी तळ ठोकला. या प्रदेशात सुप्रसिद्ध तपस्वी गोरक्षनाथ साधना करीत होते. त्यावरून या प्रदेशाला आणि तेथील मुख्य गावाला नाव पडले गुरखा. गुरख्याला राहणाऱ्या या रजपूतांनाही तेच नाव पडले. या रजपुतांनी तद्देशीयांशी संबंध जोडले. त्यांचेच वंशज आजचे गुरखा लोक.

रजपुतांबरोबर व त्याही आधी अनेक हिंदू ब्राह्मणही नेपाळात आले होते. त्यांनी नेपाळी बायकांशी विवाह केले. या बायकांच्या संततीला त्यांनी ब्राह्मण्य दिलं नाही तर क्षत्रियपद दिलं. ब्राह्मणांच्या या क्षत्रिय संततीला म्हणतात 'खस'. गुरखा भागातील रजपूत मोठे पराक्रमी. खस या हिंदूधर्मीय नेपाळींच्या साहाय्याने त्यांनी इ. स. १५५९ मध्ये स्वतंत्र राज्य स्थापन केले. त्यांच्या पृथ्वीनारायण या प्रतापी सम्राटाने इ. स. १७६६ त दिग्विजयास सुरुवात केली आणि काठमांडूच्या मल्ल घराण्याचा पराभव करून काठमांडू खोरे आणि त्यानंतर नेपाळचा इतर भाग तसेच सिमला, डेहराडूनपर्यंतचा गढवाल आणि सिक्कीम व तिबेटचाही काही भाग जिंकला. तेव्हापासून काठमांडू ही नेपाळची राजधानी बनली. पृथ्वीनारायणाचेच घराणे आज नेपाळवर राज्य करीत आहे. राजघराण्याचे नाव शहा, मूळ रजपूती, पण जीवन आणि भवितव्य नेपाळशी एकरूप झालेलं.

पोखऱ्यासारख्या व्यापारी शहरात बहुतेक सर्व जमातींचे लोक पाहावयास मिळतात. नेपाळमध्ये बरीच वर्षे राहिलेला स्विस शास्त्रज्ञ टोनी हेगन तर पोखऱ्याला 'मानववंशशास्त्रज्ञाचा स्वर्ग' म्हणतो. नेपाळच्या सर्व भागातले लोक येथे व्यापारानिमित्ताने विशेषत: हिवाळ्यात जमतात. पोखरा खोरे सोडून आम्ही पहाडी प्रदेशात

शिरलो आणि 'परबतीयां'चा –गुरुंग–मगर वगैरे लोकांचा–मुलूख सुरू झाला.

## पहाडी प्रदेशांतील घरे

सात–आठ हजार फूट उंचीचे प्रचंड पहाड आणि त्यांच्या उतारावर ठिक-ठिकाणी दहा–वीस घरांचे झुपके लटकलेले, असे इकडील खेड्यांचे सर्वसाधारण स्वरूप. पहाडाच्या पायथ्याशी फत्तरांच्या राशींमधून खळाळणारा झरा. त्यावर झुलता पूल आणि दोन्ही तीरांवर घरे. प्रवाहाच्या तीरांवर वसलेली खेडी थोडी मोठी, तीस–चाळीसपासून शंभर–दीडशे घरे असलेली. गावात दोन–तीन दुकाने.

डोंगरी लोकांच्या घराचे स्वरूप म्हणजे एकच मोठी खोली; मध्ये तट्ट्याची भिंत घालून तिचे दोन भाग केलेले. अरुंद भागात स्वयंपाकघर आणि प्रशस्त भाग ही बसण्याची खोली. प्रवाशांना भट्टी म्हणून जी जागा मिळते ती हीच. याच खोलीत उंच टोपल्यांखाली कोंबड्या झाकून ठेवलेल्या. खोलीच्या वर माळा, त्याला बाहेरून गॅलरी केलेली. त्यामुळे वाटते की, घराला दुसरा मजला आहे की काय? दोन मजली घरे पहाडात क्वचित आढळतात. खोल्याच्या काठच्या गावात मात्र ती आहेत. वर गॅलरी. लाकडावर नक्षीकाम केलेला सज्जा. दारेसुद्धा नक्षीने मढविलेली. घरातील भांडीकुंडी चकचकीत पितळेची किंवा स्टेनलेस स्टीलची. कोंबड्या आहेत पण गुरे कमी. त्यामुळे दूधदुभते कमी. डॉ. वर्तकांना दही मिळायचे नाही त्याचमुळे. अंडी, भात, बटाटे, एखादी पालेभाजी एवढे जिन्नस हटकून मिळायचे. हिवाळ्यात दूध–तूप भरपूर मिळते असे म्हणतात. गृहोत्पादित इतर वस्तू म्हणजे चांग–तांदळापासून काढलेले सौम्य मद्य, बीअरसारखे, आणि रक्षी–अल्कोहोल, थोडे कडक मद्य, रमसारखे. ठिकठिकाणच्या घरातली मद्याची चव वेगळी. हे मद्य गाळण्याची साधने बहुतेक घरातून आहेत.

उलेरीजवळ सात हजार फूट उंचीवर दृष्टीस पडतात ती अंडाकृती आकाराची घरे. छपरेही अंडाकृतीच. आत घराचे दोन भाग केलेले. आणि खिडक्या म्हणून भिंतीला चार इंच व्यासाची भोके पाडलेली!

गावात पाऊल टाकल्यावर चटकन् लक्षात येण्याजोगी गोष्ट म्हणजे पुरुषांचा अभाव. घराघरातून स्त्रियाच आढळून येतात. तरुण पुरुष तर क्वचितच दिसतो. तो सन्यात किंवा व्यापारासाठी इतरत्र गेलेला. मोठ्या धिटाईने पुढे येऊन तुमचं स्वागत करते ती स्त्रीच; तुमच्याशी पैशाबद्दल हुज्जत घालते ती स्त्रीच, आणि मिस्किलपणे तुमची थट्टा करणाऱ्या, आपापसात तुमच्यावर कोटया करणाऱ्या ही स्त्रियाच. जणु काही मातृसत्ताक प्रदेशात शिरलो आहोत आपण.

स्त्री–पुरुषांमधील समानता ही आपल्याकडील सुधारलेल्या समाजातही इतकी आढळायची नाही. शिवाय हे बरोबरीचे नाते कृत्रिम, प्रयत्नसाध्य नाही– आपल्या शहरी समाजासारखे. पुरुषांशी बरोबरीच्या नात्याने वागणाऱ्या, थट्टा–मस्करी करणाऱ्या स्त्रिया पाहिल्या की त्यांच्याबद्दल गैरसमज होणे स्वाभाविक. या मन-

मोकळेपणाचा अर्थ स्त्रिया वर्तनाने स्वैर आहेत असा करण्याचा मोह कोणाला होईलही. पण अधिक परिचयान्ती हा समज चूक आहे हे लक्षात येईल. त्यांची मर्यादशीलता निराळी आहे. परपुरुषाशी मान वर करून न बोलणे, त्याच्या वाऱ्यालाही उभे न राहणे या गोष्टी तीत बसत नाहीत, परिस्थितीच अशी आहे की त्या तशा बसणे शक्य नाही.

## नीतीच्या निराळ्या कल्पना

थोडक्यात म्हणजे या पहाडी लोकांच्या नीतीच्या कल्पना निराळ्या आहेत, त्यांचा पायाच वेगळा आहे, ही नीती अजूनही 'ट्रायबल' आहे, शहरी-सुधारलेल्या समाजापेक्षा-वेगळी आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे बहुपतित्वाची चाल. अजूनही काही जमातींमध्ये ही चाल रूढ आहे. इतर काही जमातींमध्ये स्त्रीने विवाहबाह्य संबंध ठेवणे हा अक्षम्य गुन्हा समजला जात नाही, ताटातूट फार सोपी आहे आणि असल्या गोष्टींबद्दल फारसा मनस्ताप नेपाळी मनुष्य करून घेत नाही—तो घटस्फोट घेतो आणि दुसरी बायको पाहण्यास मोकळा होतो. आपल्याकडील काही आदिवासींमध्यही अशीच परिस्थिती आढळते.

खरोखर या निर्भय, कर्तबगार स्त्रियांबद्दल कौतुक वाटायला लागते. घोडेपानीची गोष्ट. नऊ हजार फूट उंचीवर घनदाट जंगलाने व्यापलेल्या पहाडावर मोक्याच्या ठिकाणी वसलेले घोडेपानी हे चिमुकलं खेडं. खेडं म्हणजे फक्त दोन—तीन घरेच. त्यात एकच भट्टी. एक तरुण स्त्री आणि तिची म्हातारी आई या भट्टी चालविणाऱ्या स्त्रिया. या रस्त्यावर प्रवासी कोण तर खेचरांवरून माल वाहून नेणारे राकट, तिबेटी खेचरवाले. दुपारच्या जेवणासाठी आम्ही भट्टीत थांबलो होतो. "दीदी चाय, दीदी चाय !" अशा आरोळ्या ठोकीत पाच—सहा, धिप्पाड, उंचेपुरे, कमरेला कट्यार लटकावलेले तिबेटी खेचरवाले खाड्—खाड् बूट वाजवीत आत शिरले. त्यांच्याशी गप्पा मारीत, हास्यविनोद करीत बाई चहा बनवीत होती. चहा पिऊन, पैसे देऊन, तिला नमस्कार करून ते थोड्यावेळाने निघून गेले. इतक्या एकाकी ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या या स्त्रियांचे कौतुक नाही का वाटणार !

दाना या गावापासून थेट तिबेटच्या हद्दीपर्यंत वेगळ्याच जमातीचे पहाडी लोक राहतात. त्यांचे नाव थकाली. अन् या प्रदेशाला म्हणतात थाकोला. मंगोलियन वंशाचे हे लोक जातिवंत व्यापारी पेशाचे. गावात सर्वांत व्यवस्थित आणि सघन भट्टी असायची थकाली बाईची. चीन आणि तिबेट यांच्याशी पिढ्यान्पिढ्या व्यापार करीत असल्याने सर्वसाधारण थकाली व्यापारी श्रीमंत आहे. टुकुचे आणि लारजुंग गावात त्यांचे केवढे मोठे वाडे आहेत. १९५९ सालापासून मात्र तिबेटशी व्यापार बंद पडला आहे आणि थकाली लोक काठमांडू, भारतीय सरहद्दीवरची गावे, अशा ठिकाणी व्यापारानिमित्त गेले आहेत. आम्हांला जे थकाली व्यापारी भेटले ते हिंदूच होते. पण यांचा हिंदू धर्म मात्र निराळा आहे ! त्यांच्या चार प्रमुख देवता आहेत.

गावात या देवतांची चार मंदिरं असायचीच. हिंदू धर्मातील इतर देवांची उपासना मग ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे.

आनंदी स्वभाव आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व हा पहाडी लोकांचा स्थायीभावच आहे की काय कोण जाणे ! थकाली लोकही त्याला अपवाद नाहीत. टोनी हेगन तर म्हणतो, जितक्या अधिक उंचीवर लोक राहतात तितके ते अधिक आनंदी. पण त्याचबरोबर चौकसपणाही वाढत जात असावा. वर्तकांच्या वनस्पती आणि बडव्यांचे फत्तर यांच्याबद्दलचे लोकांचे कुतूहल असेच वाढत जात चालले होते. वर्तक मुक्कामावर पोचल्यावर जमविलेल्या वनस्पती वाळवायला आणि 'प्रेस' करावयास बसले की त्यांच्याभोवती मुले, तरुण लोक, बायका यांचे कोंडाळे जमायचे. त्यांचे शंका-समाधान करताना वर्तकांचाही फायदा होत होता. वनस्पतींची नेपाळी नावे त्यांच्याकडे जमा होत होती. "ये कौनसा पेड़ है ?" हा वर्तकांचा प्रश्न वाया गेलेला फारसा आठवत नाही.

## चोरी हा प्रकार नाही

प्रामाणिकपणाबद्दल पहाडी लोक प्रसिद्ध. आपल्या गढवाल हिमालयातील लोकांच्या प्रामाणिकपणाचा अनुभव आम्ही घेतलेला होता. तोच अनुभव नेपाळमध्ये आला. तुम्ही ठेवलेल्या कोणत्याही वस्तूला हात लागायचा नाही. परत येताना वापरावयाचे खाद्य-पदार्थ वगैरे सामान आम्ही भट्टीतच ठेवून जात होतो. ते जसेच्या तसे परत तर मिळायचेच पण सामानाचे रक्षण करण्याबद्दल पैसे घ्यायचे असतात ही कल्पनाही कोणाच्या डोक्यात शिरलेली आढळली नाही ! बरोबरचे हमालही प्रामाणिक. लागेल ती वस्तू धीटपणे मागून घ्यायचे, गुपचूप काही फस्त केले आहे, हा प्रकार नाही.

नेपाळी लोकांच्या प्रामाणिकपणाच्या कथा प्रसिद्ध आहेत. तुम्ही एखाद्या नेपाळ्याजवळ प्रवासात पैसे ठेवण्यासाठी द्या. तो आपल्याजवळ पैसे आहेत याचे ठिकठिकाणी प्रदर्शन करील. पिशवी असेल तर ती ठेवताना एवढा आवाज करील की त्यात नाणी आहेत हे समजावे. आपल्याला साहेब लोक किती महत्त्व देतात, हे इतरांना दाखवून त्यांच्यावर छाप पाडण्याचा त्याचा हा प्रयत्न. पण आपण नकळत चोरीला उत्तजन देत आहोत ही गोष्ट त्याच्या लक्षात यावयाची नाही. कारण चोरी हा प्रकारच क्वचित् घडून येणारा.

१९५२ सालच्या स्विस एव्हरेस्ट मोहिमेला पैसे कमी पडले म्हणून त्यांनी एका शेरपाला रक्कम आणावयास काठमांडूला पाठविले. हा पठ्ठ्या बारा हजार रुपये एवढी मोठी रक्कम बरोबरच्या पिशवीत घालून पंधरा दिवस एकसारखे चालत त्यांच्या छावणीवर सुखरूप येऊन पोचला. ही रक्कम नेपाळी माणसाच्या मानाने एवढी मोठी होती, की त्याला जन्मभर कशाची ददात पडली नसती. स्वतः त्या रकमेला हात लावण्याचं त्याच्या मनात तर नाहीच आलं, पण त्याच्यावर हल्ला

करून ती रक्कम पळविण्याचाही प्रयत्न झाला नाही !

### हिंदुधर्माच्या खुणा

नेपाळ हे जगांतील पहिलेच अविकृत हिंदुराष्ट्र. १९६२ सालच्या घटनेप्रमाणे अहिंदू माणसाला नेपाळच्या सिंहासनावर बसता येणार नाही, अशी तरतूद केलेली! बौद्धधर्मीय लोकही मात्र नेपाळात कमी नाहीत. हिंदू–बौद्ध असा फरक व्यवहारात जाणवतच नाही. दोघांनीही एकमेकांच्या चालीरीती, देवदेवता स्वीकारलेल्या आणि हिंदू व बौद्ध धर्मीयांत हेवेदावे, स्पर्धाही नाही. राजा महेंद्र हिंदू पण बौद्धांच्या बाबतीत उदारमतवादी. बुद्धाची २५०० वी पुण्यतिथी साजरी करण्यात राजा त्रिभुवन आणि राजा महेंद्र यांनी अविकृतपणे पुढाकार घेतलेला. १९५६ साली या सोहळ्यासाठी भरलेल्या परिषदेस सगळ्या जगातून प्रतिनिधी आले होते. परिषदेचे उद्घाटन आणि समारोप स्वतः राजाने केला. मात्र राणा लोक हिंदू धर्माचे कडवे अभिमानी होते खरे, पण सहिष्णू नव्हते. काठमांडूच्या बुद्ध भिक्षूंना त्यांनी देशाबाहेर घालवले होते. उलट, राजाच्या या सहिष्णू धोरणामुळे बौद्धांची मने


ज्वलंत राष्ट्रवादाच्या
भयानक ीप्तीचा
ललितभव्य आलेख

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**रा. म. शास्त्री**
मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या
प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,
४१९ नारायण पेठ, पुणे २.

त्याने जिंकली, यात शंका नाही.

त्या दिवशी आम्ही भल्या पहाटेच उठून चालावयास सुरुवात केली. गावातल्या रस्त्यावर शुकशुकाट होता. इतक्यात एका घरातून गंभीर स्वरात पठन चालल्याचे ऐकू आले. कोणी तरी स्तोत्रे म्हणत होता. अस्खलित संस्कृत शब्द कानांवर पडत होते. ही गोष्ट कोठली ! टुकुचाची, मंगोलियन वंशाच्या थकाली लोकांच्या प्रदेशातली, नेपाळच्या तिबेटसदृश भागातली. हिंदू धर्माच्या खुणा अशा जागोजाग आढळतात. सकाळी निघालो की, खेड्यातले नेहमीचे दृश्य म्हणजे स्त्रिया सडा–संमार्जन करीत असलेल्या. बिरेथाटीला तर वटवृक्षांची पूजा मनोभावे चाललेली पाहिली. वडाला प्रदक्षिणा चालल्या होत्या. वर कोणता बरं मागत असतील या स्त्रिया ? मार्फाचा हॉटेलवाला, बकऱ्याचं मांस कापण्यावर देखरेख करीत होता. तो हिंदू–स्वत: मांस कापणार नाही. त्यासाठी तिबेटी लोकांना बोलावील, पण काम चालू असताना शिवनामाचा जप मात्र थांबला नव्हता त्याचा ! कुमुमाच्या गुहेत प्रस्तरांच्या निरनिराळ्या आकारांना शंकर–पार्वती, राम–सीता, हनुमान, रामपंचायतन, रावणाची सेना अशी नावे दिलेली, त्यांच्यापुढे फुले टाकलेली. शिवाची मंदिरे तर गावोगावी आढळतात आणि मुक्तिनाथ हे जसे हिंदूंचे तसेच बौद्धांचे आणि इतर टोळीवाल्यांच्या पंथांचेही तीर्थस्थान आहे.

परबतीयांचा हा धर्म जरासा राकट असला तर नवल नाही. मांसाशन निषिद्ध नाही, रक्षी आणि चांग पिणंही धर्माला असंमत नाही. दसऱ्याच्या दिवशी तर काठमांडूमध्ये शेकडो रेड्यांचा बळी दिला जातो. देवावर प्राण्याचं रक्त शिंपडणं ही त्याची फार मोठी सेवा. पेपा सरोवरच्या मध्ये असलेल्या मंदिराचा परिसर अतिशय रम्य आहे. पण मंदिरात जागोजागी रक्त सांडलेलं !

अस्पृश्यता, जातीयता ही हिंदू धर्माची भडक पदचिन्हे येथ न आढळली तरच नवल. सनातनी ब्राह्मणच नव्हे तर सामान्यत: नेपाळी बाह्मण शूद्रांच्या हातचे खायचा नाही, त्यांच्या पंक्तीला बसायचा नाही. अस्पृश्यांना मंदिरप्रवेश इतके दिवस नव्हता पण आता या बाबतीत पुजाऱ्यांचं मन वळविण्यात आलं आहे असं कळलं. सतीची चाल आणि गुलामगिरीही होती पण चंद्रसमशेर या पुरोगामी राण्याने ( पंतप्रधानाने ) या दोन्हींचे उच्चाटन केले.

पण काही बाबतीत मात्र हिंदू धर्माचे " शुद्ध " स्वरूप अजून टिकून आहे. नेपाळात संपूर्ण गोवध-बंदी आहे. गोवधाला इतकी कडक शिक्षा आहे आणि गोवध-बंदीचे पालन इतक्या काटेकोरपणे केले जाते की आपल्याकडील गोरक्षा समितीस हेवा वाटावा. ब्राह्मणवधालाही बंदी आहे. टंकाप्रसाद आचार्य या ब्राह्मण कम्युनिस्ट पुढाऱ्याला राणाशाहीत जीवदान मिळालं याचमुळे. धर्मांतरासही बंदी आहे. त्यामुळे मिशनरी आणि त्याची दयार्द्र उदारता यांपासून नपाळ अलिप्त आहे. प्रजा मनानेच नव्हे तर शरीराने सात्त्विक राहावी इकडेही सरकारचे लक्ष आहे. नेपाळमध्ये

डालडाला बंदी आहे ! शुद्ध 'घी' च सर्वांनी खाल्लं पाहिजे.

साल कोणतं असं विचारलं तर आपल्या डोक्यात चटकन् येतं १९६८ आणि महिना जुलै. सामान्य नेपाळ्याला ते साल समजत नाही. त्याला फक्त चैत्र, वैशाख, ज्येष्ठ वगैरे महिनेच समजतात आणि नेपाळी शक समजतो. इसवी सन चालतो फक्त काठमांडूत किंवा पोखऱ्यात. गुरखाली भाषेची लिपी आहे देवनागरीच.

असं हे हिंदू-राष्ट्र अन् त्यातील हिंदू लोक ! आमच्या बडव्यांना मात्र एका गोष्टीची फार खंत वाटायची. "ब्राह्मण म्हणवितात अन् महिन्यातून एकदा तरी आंघोळ करतात का ?" ते म्हणायचे. खेडेगावात एखादा सुंदर चेहरा दृष्टीस पडला की ते हळहळायचे. "बाई ग, तू सुंदर आहेस कबूल ! पण आठवड्यातून एक-दोनदा तरी आंघोळ करीत जा !!" शरीरशुचितेचा आणि ब्राह्मण्याचा काही बादरायण तरी संबंध आहे हे या लोकांच्या ध्यानात आलं नसावं. टोनी हेगनसुद्धा म्हणतो की सर्वांत अस्वच्छ खेडी कोणती असतील तर ती म्हणजे तराईतील ब्राह्मण शेतकऱ्यांची. एक तर या जमिनीतून फारसे कष्ट न करता उत्पन्न निघते आणि दुसरं म्हणजे श्रमाची कामं करणे ब्राह्मण कमी दर्जाचे मानीत असावेत ! पण अस्वच्छता मात्र सार्वत्रिक आहे. त्यामुळे निरनिराळ्या रोगांचे प्रमाणही जास्त. दळणवळणाची सोय नसल्याने डॉक्टर मिळणेही कठीण. त्यामुळे आमचा खेड्यात मुक्काम पडला की पहिली ओळख व्हावयाची रुग्णांशी. "डॉक्टर" बडव्यांच्या पोतडीत निरनिराळ्या औषधांचा साठा होता म्हणून बरे!

नेपाळी खेड्यांत सांघिक कार्याचा अजिबात अभाव ही गोष्ट अनेकांनी नोंदवून ठेवलेली आहे. हा आपल्या धर्माचाच प्रभाव की काय, असा प्रश्न मनात उभा राहतो. प्रत्येकजण आपल्यापुरते पाहतो. त्यामुळे गावाची स्वच्छता, रस्ते, पूल या गोष्टींकडे सरकारचे लक्ष गेले नाही तर त्यांची दुरुस्ती कधीच व्हावयाची नाही शेरपा, थकाली असल्या मंगोलियन जमातीत मात्र सामूहिक कार्याची प्रथा थोडीशी आढळते.

अशा या प्राचीन, निरामय, स्थिर जीवनात सुधारणेचे वारे वाहायला लागले आहेत यात शंका नाही. पण ते येत आहेत पश्चिमेकडून. अगदी दूरदूरच्या खेड्यांतही अमेरिकन शांतिदूत, ब्रिटिश, जर्मन, जपानी स्वयंसेवक या जीवनात बदल घडवून आणण्याचा, या जनतेस पुढे खेचण्याचा प्रयत्न करीत आहेत. खेड्यापाड्यातूनही लहान मुले, तरुण, पाश्चिमात्य आचार उचलू लागली आहेत. आढळत नाहीत ते भारतीय. गोऱ्या, विलायती कातडीबद्दल एक सुप्त संशय तद्देशियांना वाटतो हे नक्की. या उलट आम्हा भारतीयांचे स्वागत झाले, बरोबरीच्या नात्याने. संशयाचे पटल न येता. इतर भारतीयांचे स्वागतही तसेच होईल असे मानणे चूक होणार नाही. [अपूर्ण]

# सहचारिणी

माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी !

......तिच्यासाठी माझं मन आक्रंदत आहे. प्रेमाच्या वर्तुळात भरकटत आहे. प्रीतीची रेशमी वलये थरथरत आहेत. पाण्यात एखादा खडा टाकावा त्या प्रमाणे ! माझ्या हृदयाच्या तारा छेडल्या जात आहेत...तंबोऱ्या-प्रमाणे !! त्यातील सूर ?... भेसूर, आगामी संकटाची सूचना देणारे कर्णकटू...भयंकर सूर ! म्हणून मी तळ-मळत आहे... मासोळीप्रमाणे वळवळत आहे. आणि माझं मन आक्रंदत आहे... केवळ तिच्यासाठी !

**मी जागा झालो, स्वप्न आणि सत्य क्षणभर समजेना. ज्युली घरातच होती. देवापुढे निरांजन लावत होती.**

तो प्रसंग मला आठवतो. अगदी पूर्णपणे.

मी बसलो होतो. निश्चल, काही न करता. इत-क्यात ती आली. प्रथमतःच, सूर्य उगवण्यापूर्वी... पूर्वक्षितिज नटण्यापूर्वी तेजोमय झालेल्या शुक्र-ताऱ्याच्या तेजासारखी ती आली ! पांढरे शुभ्र पातळ नेसून आणि तसलाच ब्लाऊज परिधान करून. पांढुरक्या ढगासारखी ती आली !! गालावर लाली घेऊन... केसामध्ये लाल गुलाब माळून 'फुलवेडी' होऊन ती आली !!! रंभेसारखी !... अप्सरेसारखी ती आली !

सुरेश म्हाते



नव्हेच, फुलराणीसारखी ... रातराणीसारखी ...... जाईजुईच्या फुलासारखी ती आली. मेनका–उर्वशी यांचे अस्तित्व प्रकट करायला आली ? नव्हेच, महाराष्ट्रीयन मुलीसारखी ती आली. सुबक... सुरेख सुरांगनेसारखी ती आली. मध्यम वयाच्या डौलदार तरुण्याताठ्या सुसंस्कृत मराठी मुलीसारखी ती आली. माझ्या वीणेसारखी आली......

वीणा, माझी सहचारिणी...... धर्मपत्नी, जीवनात आली आणि गेली ... श्रावणधारेसारखी ! मला जखम झाली...यातना झाल्या... दुःख झाले. ते मी लेखणीद्वारे प्रत्यक्षात उतरविले. माझी जखम भरायला मला कुणीतरी हवे होते. ‘ जखमेच्या कळा ’ मी लिहिली, स्वानुभव व स्व–जीवनाचा मूर्तिमंत आविष्कार ! कादंबरी गाजली आणि कुणीतरी लाजली, ती ही लाजत–लाजत ‘ परी ’समान माझ्या दारी उभी ठाकली......

तिने मला सावरायचा प्रयत्न केला. माझी जखम भरून काढण्याचा प्रयत्न केला. निष्ठापूर्वक...भक्तिभावाने अन् श्रद्धेने, तिच्यासाठी माझं मन आक्रंदत आहे... केवळ तिच्यासाठी !

–प्रथम ती मला ओळखली नाही. तिचं असं एकदम येणं मला अनपेक्षित होतं. दारावरली बेल वाजल्याबरोबर मी दार उघडलं. दारात पाहिलं. ती रूपसुंदरी–सौंदर्यपरी उभी होती. मी पाहातच राहिलो. रंगीबेरंगी स्वप्नांच्या इंद्रधनुष्याखाली उभ्या असलेल्या त्या ‘ कांते ’ला मी न्याहाळीतच राहिलो !

‘ लेखक सुरेशदत्त आपणच ना ?’ तिने विचारले. मी भानावर आलो.

‘ अं ऽऽ हो, मीच. आपण......?’ माझा प्रतिप्रश्न.

‘ मी ज्युली......’

......ज्युली ? हो. आठवलं. मला सारं आठवलं. गल्याच महिन्यात तिचं पत्र

आलं होतं. आता ती स्वत:च आली होती. एक ख्रिश्चन मुलगी. धर्मानं वेगळी अन् जातीनं भिन्न अशी एक नर्स. तारुण्याच्या उंबरठ्यावर असलेली गुलाबकळी ! ती गुलाबकळीसारखी आली. आमच्या मराठमोळ्या सभ्य मुलीसारखी आली. माझ्या वीणेसारखी......

माझ्यावरून जीव ओवाळायला आली.

'या, बसा,' अंगुलिनिर्देश करून मी तिला कोचावर बसायला सांगितले.

'आपल्या येण्याचं कारण—?'

'जखमेच्या कळा !' ती पटकन उत्तरली.

'म्हणजे......?'

'होय.' अभावितपणे मध्येच ती म्हणाली.

......म्हणजे माझी जखम भरायला ती आली होती. धर्मानं वेगळी—जातीनं भिन्न—समाजाहून परकी, मला आश्चर्य वाटले. किंबहुना ती आली. एकदा आली ती मग अनेक वेळा आली. आणि अनेक वेळा आली ती कायमची आली. परत न जाण्याकरिता आली. प्रीतीच्या पालवाखाली माझ्या मनाचे पोषण करायला ती आली. जीवनवेल बहरविण्याला ती आली, तिच्यासाठी माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी !

आम्ही लग्न केले. जीवनाच्या बंधनरश्मींनी पति–पत्नी म्हणून जखडलो गेलो. माझ्या माणसांना कळलं. प्रतिक्रिया उलटी झाली. माझ्याविरुद्ध साऱ्यांनी आक्रोश केला. मी त्यांना झुगारले.

मला माणसे किती ? दोनच. भाऊ आणि बहीण. बाकी मी एकटाच. त्यांच्या मायेचे पाश मी तोडले आणि प्रीतीला कवटाळली. माझी बहीण परक्या घरची, फक्त भावाचा इटुकला–मिटुकला संसार. इन् मीन् तीन माणसं, त्यांच्या विरोधाला मी जुमानले नाही. माझी वहिनी आड आली.

"भाऊ, हा धर्माला कलंक आहे. जातीला कलंक आहे. तुमच्या उच्चभ्रू कुळाला कलंक आहे !" हे माझ्या वहिनीचे बोल. त्यात माया होती, प्रेम होतं की धर्माचा 'वृथा' अभिमान होता, हे त्या वेळी मला कसं कळणार ? मी प्रीती जवळ केली. प्रीतीला जग कुठून दिसणार ! जगाला तरी प्रीती कुठे दिसते ? शुद्ध प्रीती ! ती जर दिसती तर अशा सुंदर जीवनात संघर्ष न होते !

'ज्युली ऽ !' मी ज्युलीला कवटाळली.

'हं ऽ.' ती माझ्या मिठीत शिरली. ही पहिली वेळ, त्यानंतर अशा किती वेळा आल्या आणि गेल्या. अजूनही येतात नि जातात. रोजच्या रोज ! पण—

'ज्युऽलीऽऽ !' माझा स्वर जडावला. थरथरला. कातरला.

'अशी किती वेळ तू पडून राहशील ? किती काळ स्वप्न पाहशील ?'

'असं रे काय राजा !' माझ्या कातर स्वराची तिला जाणीव झाली होती.

'ज्युलीऽ. कशासाठी तूं एवढा त्याग केलास ? हे रूपयौवन कशासाठी मला वहाल केलंस ? माझी जखम भरण्यासाठी ? वेडे, त्यामुळे तर ती अधिकच मोठी होत आहे. हे काय केलंस तू ?'

'राजा, तुझी जखम नाही ! आता मी मोठी होणार आहे. खूप मोठी. मला खूप मोठी व्हायचं आहे राजा, खूप मोठी !'

'पण–? नाही ज्युली...नाही !! मला सतार वाजविता येत नाही. त्यावरची बोटं-सराईतपणं फिरविता येत नाहीत. सराईतपणं फिरविली, किंबहुना तसा प्रयत्न केला तर त्यातून बेसूर बाहेर पडतात. मनाला आनंद देण्याऐवजी दुखविणारे स्वर. तुला सुखविण्याऐवजी फसविणारे सूर !'

मला सुरांची लय साधत नाही. त्यातून संगीत निर्माण कोठून होणार ? आजपर्यंत हे असंच चाललं आहे. यापुढेही चालत राहणार आहे. ज्युलीला मी दुःखाशिवाय काहीच देऊ शकणार नाही. स्वप्नाच्या सप्तरंगी कमानीखाली तिच्या आशा आहेत–अपेक्षा आहेत. कसली तरी अपूर्त इच्छा उराशी घेऊन ती त्या कमानीखाली उभी आहे. कोणाची तरी 'वाट' पाहात आहे. पण मला माहीत आहे. ती ज्याची वाट पाहत आहे 'तो' कधीच येणार नाही ! अखेर ती कंटाळेल–कंटाळेल आणि निराश होऊन...इंद्रधनूच्या स्वप्नकमानीला टांगोळी मारून–ती श्रद्धेच्या... माझ्यावरच्या भक्तीच्या स्वप्नसुरांवर उडी घेईल. त्यांना पायांखाली तुडवून...मला

काळ्याभोर रेशमी विपुल केसांकरिता

डोंगरे
# अप्सरा
हेअर ऑईल

उत्पादक

**के. टी. डोंगरे अॅण्ड कं., प्रा. लि.,**

मुंबई, कानपूर, नैरोबी ( आफ्रिका )

**डोंगरे बालामृताचे**

सोडून ती सागराकडे धाव घेईल आणि फेसाळणाऱ्या लाटांत स्वत:ला झोकून देईल. अरे अरे ! किती अशुभ–अभद्र कल्पना. पण तेच सत्य आहे. मला माहीत आहे. म्हणूनच माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी–!

ज्युली एक सुगंधित फूल आहे. सुगंधित फुलाचे काहीतरी कार्य असते. पण हे फूल अजून सार्थकी लागले नाही. यापुढे लागेलसे मला वाटत नाही. किंबहुना ते निर्माल्यसमान आहे. निर्माल्य म्हणून माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी !

–तथापि याचं दु:ख केवळ मला आहे. तिला त्याचं काही नाही. आजपर्यंत तिनं तसं दाखविलं नाही. पण अखेर ती एक स्त्री आहे. मला माहीत आहे. तिच्या मनात केव्हातरी व्यथांची आग भडकणार आहे. कसल्यातरी उणीवेचा डोंब उसळणार आहे. आपणाला मातृपद नाही हे तिला जाणवणार आहे. आपण स्वर्गसुखाला पारखे झालो हे कळणार आहे. आणि मग ती माझ्यापासून दूर जाणार आहे. माझ्यात सामर्थ्य नाही...तिला सुखविण्याची कुवत नाही म्हणून !

म्हणून माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी !

रात्रीच मला एक स्वप्न पडलं. अगदी साखरझोपेत पडलं. साखरझोपेतली स्वप्न खरी असतात म्हणे ! पण ते स्वप्न सप्तरंगी नव्हतं. भविष्यकाळ व उर्वरित आयुष्याला धक्का देणारं ते स्वप्न होतं.

...स्वप्नात ज्युली आली होती. नेहमीची हसरी गुलाबकळी नव्हे. परीसमान दिसणारी तेजस्विनी नव्हे. माझ्या वीणेसारखी भासणारी मानिनी नव्हे. ही ज्युली दु:खी होती...कष्टी होती. त्याला कारण मीच होतो...मी, हे अगोदरपासून मला माहीत होतं. तिला ते ' आता ' कळलं होतं म्हणून माझं मन आक्रंदत आहे. केवळ तिच्यासाठी !

–मी पाहिलं. ज्युली निघाली होती. दूर...दूर...दूर. कुठे ? कुणास ठाऊक. पण ती चालली होती. जाताना तिनं मला आलिंगन दिलं. शेवटचं गोड चुंबन घेतलं. त्याची रसमाधुरी अजून माझ्या ओठांवर तरळत होती. ज्युली पाच पावलं चालली आणि मी तिला जोराने हाक मारली–' ज्यूऽऽलीऽऽ ! '

मी जागा झालो. डोळे चोळले. मी मघा पाहिलं ते स्वप्न होतं की मी आता पाहात होतो ते स्वप्न होतं मला कळेना ! मी डोळे फाडून पाहिलं. ' ज्युली ' कुठं गेली नव्हती. ती घरातच होती. पहाटेच्या प्रभातसमयी जातीनं मित्र आणि समाजानं परकी अशी ही ज्युली देवापुढे निरांजनाची वात लावीत होती.

–मी जागा झालेला पाहताच नेहमीची हसरी ज्युली माझ्याकडे धावत आली आणि.. माझ्या बाहूत शिरली.

रेडिओवर सकाळीच गाणं लागलं होतं...' दिव्या दिव्यांची ज्योत सांगते तुझी नि माझी प्रीती । तुझी नि माझी प्रीती ! ' साहजिकच माझं लक्ष ज्युलीनं लावलेल्या निरांजनाकडे गेलं. त्याची ज्योतसुद्धा मला तेच सांगत होती... O



## अवडंबर

असता कोठे निरभ्र अंबर
कसे भरावे मेघांनी अंबर

प्रशांत असता कुठेहि सागर
कशास माजे लाटांचे संगर
लांब सडक त्या माळावर
कसा वसावा कुठेहि डोंगर

उंच वाढला जिथे औदुंबर
प्राणप्रतिष्ठा तिथे दिगंबर
ओटीवरच्या चौकटीवर
कुणी ठेविती कुठे पितांबर

स्वच्छ मोकळ्या कडीपाटावर
कुणी बांधिती मोत्यांचे झुंबर
हरित गारव्या शेतावर
कुणी फिरविती कसाहि नांगर

हलक्या फुलक्या भावावर
नाजुक, कोमल शब्दावर
असंख्य कृत्रिमतेचे डोंगर
कुणी माजविती हे अवडंबर

*अरविंद बा. फडणीस*

## कळी खुलावी


कळी खुलावी अशी अचानक
स्मितात जावे मौन विरघळूनी
जन्मांतरीचे देणे घेणे
पुरते व्हावे या जन्मातुनी
सहज लाजरा भाव दिसावा
प्रीत पाखरे नजरेमधुनी
अमृत व्हावे जीवित आपुले
गंधित व्हावी एक कहाणी
अंधाराच्या खोल दरीतून
शून्य ज्योतीने गाणे गावे
अर्ध्या अर्ध्या वाटेवरती
वेडे होऊनी वळुनी बघावे
या अर्ध्यावर, त्या अर्ध्यावर
रात्र वादळी जावी संपून
पुढल्या जन्मी भेट नको ती
या जन्मी ग व्हावे मिलन

*गोपाल ढेडगावकर*

## डागाळली प्रीति !

आकाशाचे सज्जे कुजबुजती
डागाळली डागाळली प्रीती
अंधाराच्या भिंती लाविती कान
वाऱ्याच्या लहरी जागवि रान
वृक्ष-लता, वेळु वेळावती मान
खदखदून हसते झाडाचे पान
मिचकावुन डोळे काजवे बघती
डागाळली, डागाळली प्रीती

*राजा आमकर*



दत्तप्रसाद दाभोळकर

# अणुहल्ला झाला

बारा तेरा वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळी मी मॅट्रिकला होतो. महाराष्ट्रातल्या त्या-वेळच्या एका 'मधुसुदन' वक्त्याने त्या वेळी आमच्या शाळेत एक जबरदस्त भाषण दिले होते. आजच्या अणुयुगात युद्ध किती अशक्य आहे हे प्रथम त्याने पटवून दिले. राष्ट्राजवळ एक कोटी खडी फौज पाहिजे, या सावरकरांच्या विधानाची तर त्याने थट्टा केली. शेवटी तो म्हणाला होता, "अणुविज्ञान न कळणारा माणूसच या युगात सेनादलाच्या गप्पा मारील. तिसरे महायुद्ध जर झालेच तर ते इतके भयानक असेल, की ते सुरू झालंय याची बातमी पण कुणाला रेडिओवरसुद्धा कळणार नाही. त्यापूर्वीच एका महाभयानक अणुयुद्धात सारे जग नष्ट झाले असेल, आजच्या मनूत, या अणूयुद्धाच्या प्रलयात खुद्द मनुसुद्धा जगू शकणार नाही.

त्या 'मधुसुदन' वक्त्याच्या भाषणाला आम्ही मारलेल्या टाळ्या पुढे अनेक दिवस माझ्या कानात घुमत होत्या. एक दिवस नेफा आघाडीवरून शत्रूच्या अफाट सेनादलाला पाठ दाखवून परत फिरलेल्या, मूठभर जवानांच्या पावलांच्या आवाजात त्या टाळ्या नष्ट झाल्या. त्या जवानांनी, जणू संदेश दिला होता.... 'अरे, राष्ट्राजवळ किमान एक कोटीची खडी सेना हवी. सेनासागराशिवाय स्वातंत्र्य,

जोपर्यंत अण्वस्त्रे अवगत नव्हती तोपर्यंत माओने 'कागदी वाघ' म्हणून त्यांची टिंगल केली. पण आता सारे सामर्थ्य पणाला लावून त्याने हा 'कागदी वाघ' सुद्धा हस्तगत केला आहे.

## तर काय कराल.....???

म्हणजे विधवेने लावलेले कुंकू !'

–बाकी चिनी राज्यकर्ते बेटे हुशार. त्यांनी अफाट सेनादल उभारले. जोपर्यंत अण्वस्त्रे अवगत होत नव्हती तोपर्यंत 'कागदी वाघ' म्हणून त्यांची टिंगल केली. आणि सारे सामर्थ्य पणाला लावून एक दिवस हा 'कागदी वाघ' पण हस्तगत केला. आता कदाचित लवकरच आपणही अणुबॉम्ब बनवू. पण एक गोष्ट तर नक्कीच. आपण अणुबॉम्ब बनविला वा बनविला नाही तरीही अणुयुद्ध आता आपल्या उंबरठ्यावर येऊन थबकलेले आहे.

अणुयुद्ध महाभयानक असेल हे तर निश्चितच. पण, या अफाट विध्वंसात सारी मानवजात नष्ट होईल, यावर मात्र आज कुणाचाच विश्वास नाही. आजच कशाला हिरोशिमावर अणुबाँब पडला तेव्हाही जगातील जाणते लोक हे ओळखून होते. त्या वेळी प्रसिद्ध झालेले एक व्यंगचित्र फार बोलके आहे अणुबॉम्बच्या साठ्याकडे समाधानाने पाहत एक मुत्सद्दी म्हणतो आहे. 'अरे, हे केवढे सामर्थ्य माझ्याजवळ आहे. सारे जग मी चुटकीसरसे नाहीसे करू शकेन.' व्यंगचित्रकाराने त्याच्यावर काहीच मल्लीनाथी केलेली नाही. त्याच्याच पलीकडे त्याने दुसरे एक चित्र काढ-

लेले आहे. मोठमोठ्या दगडांचा एक भला मोठा ढीग रचलेला आहे आणि त्याच्याजवळ, ते दगड शत्रूवर फेकू शकतील अशी तरफ घेऊन एक ग्रीक योद्धा उभा आहे. मोठ्या समाधानाने तो म्हणतो आहे, 'अरे, हे केवढे सामर्थ्य माझ्याजवळ आहे. सारे जग मी चुटकीसरसे नष्ट करू शकेन !'

अणुयुद्धाच्या कल्पनेवर आधारलेली रोशवॉल्डची 'लेव्हल सेव्हन' ही कादंबरी तर यापेक्षा बोलकी आहे. अणुयुद्धाचे नियंत्रण करण्यासाठी भूगर्भात गुप्त ठिकाणी एक शहर वसवलेले आहे. शत्रूकडून अणुहल्ला झाला तर लगेच बातमी कळावी म्हणून रात्रंदिवस माणसे यंत्राजवळ उभी आहेत. कोणत्यातरी अज्ञात ठिकाणाहून संदेश येताहेत. ज्या वेळी युद्ध सुरू होईल त्या वेळी समाजातील अत्यावश्यक लोक शास्त्रज्ञ–विचारशील, सेनानायक–या ठिकाणी तातडीने हलवण्याची व्यवस्था पण केलेली आहे. किंबहुना या लोकांची एकूण सहा गटांत विभागणी झालेली आहे. प्रत्येक गटाला वर्षाचा काही काळ, या अज्ञात बंदिस्त जागेत राहावे लागते.–आणि रोशवाल्डची ही कादंबरी म्हणजे काही कल्पनाविलास नाही. नोबेल पारितोषिकाचा मानकरी, विख्यात शास्त्रज्ञ पाउलिंग याची त्या पुस्तकाला प्रस्तावना आहे. पाउलिंगने म्हटलंय, " रोशवाल्ड आपल्या भोवताली काल जे घडले वा उद्या जे घडणार आहे तेच तर सांगतो आहे !'

एक गोष्ट नक्की. जगातील प्रमुख राष्ट्रांची ही योजना अत्यंत गुप्ततेत पार पडलेली असेल. त्यासाठी त्यांना अफाट किंमत मोजावी लागली असेल. पण अहिंसेसाठी कितीही किंमत मोजली तरी ती कमी असते. आणि आपल्या निष्पाप नागरिकांचे प्राण वाचविणे यांसारखी दुसरी मोठी अहिंसा आणि भूतदया नाही !

## अणुबॉम्बचे स्वरूप

अणुबॉम्ब महाभयानक आहे, असे आपण अनेकदा म्हणतो. पण ही महाभयानकता अणुबॉम्बला का आली हे मात्र आपणाला अनेकदा नक्की माहीत नसते. अणुबॉम्ब साध्या बॉम्बपेक्षा लक्षावधी पटींनी अधिक विध्वंसक आहे हे खरे. पण अणुम्बॉब म्हणजे काही अनेकपटीनी अधिक ताकदवान केलेला रासायनिक बॉम्ब नव्ह. साधा रासायनिक बॉम्ब आणि अणुबॉम्ब यात काही मूलभूत फरक आहे. साधा रासायनिक बॉम्ब फुटतो. प्रचंड उष्णता आणि आवाज निर्माण होतो. भोवतालच्या गोष्टींचा विध्वंस होतो. आणि दुसऱ्याच क्षणी त्या बॉम्बचे परिणाम संपतात. तो बॉम्ब स्वतःच जणू मरण पावतो. अणुबॉम्बचे स्वरूप वेगळे आहे. तो फुटतो तेव्हा अमाप उष्णता निर्माण होते; हे तर खरेच, पण त्यानंतर जे काही घडते ते अधिक भयंकर असते. नंतर किरणोत्सर्ग सुरू होतो. उरलेल्या बऱ्याच मोठ्या भागावर तो पसरतो. तो अधिक भयावह असतो.

वर मी अमाप, भयावह, बऱ्याच मोठ्या भागावर, अधिक भयावह हे शब्द वापरले. आपण सारेच जण हे शब्द वापरतो. या अशा, मोघम, मोंगळ शब्दांमुळेच

आपण अनेकदा उगाच घाबरतो. कित्येकदा घाबरण्यासारखी परिस्थिती असूनही घाबरत नाही.

पण या किरणोत्सर्गाचा आपणावर नक्की काय परिणाम होतो ? प्रत्येक वेळी या किरणोत्सर्गाच्या सान्निध्यात आलेला माणूस मरणच पावेल का ? तो जर जगला वाचला तर पुढील पिढीवर काही वाईट परिणाम होईल का ? आणि समजा, एखाद्या ठिकाणी अणुहल्ला झाला. त्या वेळी त्या ठिकाणाहून मी तीस मैलांवर आहे. मला ही बातमी कळविण्यास सरकारी यंत्रणेला एक मिनिट लागले. त्यानंतर माझ्या आसणाऱ्याच्या ठिकाणी जाण्यास मला पाच मिनिटे लागली तर मला किरणोत्सर्गाचा त्रास होईल का ? काही त्रास झाल्यास मी त्यातून वाचू शकेन का ? मी वाचल्यास माझी जननशक्ती कायम राहील का ? या साऱ्या प्रश्नांचा शास्त्रीय भाषेत विचार करणे, म्हणजे अणुहल्ल्याला तोंड देण्याची मानसिक तयारी करणे. मला ही बातमी कळविण्याची यंत्रणा उभारणे आणि माझ्या आसरा स्थानाची उभारणी करणे म्हणजे अणुहल्ल्याला तोंड देण्यास सिद्ध होणे. आपण अणूबॉम्ब बनविणार असलो वा नसलो तरीही हे अटळ आहे. या महाभयानक संहारात, मी, माझ्याजवळचे कोणी कदाचित वाचणार नाहीत. पण माझ्या वंशाचे, माझ्या राष्ट्राचे काही लोक नक्की वाचणार आहेत. आणि ते लोक हा संस्कृतीचा प्रवाह पुढे नेणार आहेत. प्रत्येक जिवंत राष्ट्राच्या मनात ही जिद्द असते आणि आपणाला जिवंत राहावयाचे असेल तर आपल्याही मनात ती जिद्द असली पाहिजे.

## किरणोत्सर्गाचे स्वरूप

एखादा पंधरा मेगॅटन शक्तीचा बॉम्ब फुटला तर काय होईल ? निर्माण झालेल्या उष्णतेत आणि झंजावातात अडीच मैल व्यासाच्या वर्तुळातील साऱ्या गोष्टी संपूर्णपणे नाहीशा होतील. पाच मैल व्यासापर्यंतच्या वर्तुळातही हा संहार होईल. पण त्या टापूतील तीस ते चाळीस टक्के गोष्टी वाचतील. पुढे दहा मैल व्यासापर्यंतच्या वर्तुळातही हा ी होईल. पण ती वीस ते तीस टक्के इतकीच असेल.

पण या स्फोटामुळे जो किरणोत्सर्ग होईल तो यापेक्षा अनेक पटींनी अधिक आहे. जवळजवळ भोवतालच्या सात हजार चौरस मैलांवर या किरणोत्सर्गाचे कमी-अधिक परिणाम होतील. हा किरणोत्सर्ग कोणत्या भूभागावर होणार हे आपण आधी नक्की ठरवू शकणार नाही. कारण वाऱ्याच्या दिशेवर हा प्रदेश ठरला जाईल. समजा, हा स्फोट झाला त्या वेळी आपण एकशेसाठ मैल अंतरावर आहोत. वारा जोराने आपल्याच दिशेने येत आहे. अशा वेळी या अंतरावर जवळजवळ आठ तासांनी हा किरणोत्सर्ग सुरू होईल. हा किरणोत्सर्ग सुरू झाला त्या वेळी, या एकशे साठ मैल अंतरावरील ठिकाणी आपण जर मोकळ्या जागेत असू तर तासाला पाचशे रोंगटन इतका किरणोत्सर्ग आपणास सहन करावा लागेल. तासाला पाचशे रोंगटन हा तीव्र स्वरूपाचा किरणोत्सर्ग समजला जातो. आपल्या प्रकृतीला तो

अत्यंत अपायकारक आहे. [ आठवड्याला तीस मिली रांगटीन हा सौम्य स्वरूपाचा किरणोत्सर्ग समजला जातो. त्याने प्रकृतीला फारसा अपाय होत नाही. ]

या किरणोत्सर्गाचे आपणावर अनेक वाईट परिणाम होतील. पण आपण लगेच मरणार नाही.—कारण आत्तापर्यंतच्या कोणत्याही सुलतानाला जमले नसेल ऐवढ्या अघोरी पद्धतीने हा किरणोत्सर्ग आपणाला हळूहळू मृत्यूकडे नेईल. खरे सांगायचे तर किरणोत्सर्गाच्या तडाख्यात सापडलेल्या माणसाला संभाजी राजांचे मरण सुखाचे वाटेल !

काही थोडा काळ तुमचे शरीर किरणोत्सर्गाला प्रतिकार करील. मरण पावणाऱ्या पेशी पुन्हा निर्माण होतील. पण काही दिवसांतच तुमची प्रतिकारशक्ती कोलमडून पडेल. तुमचे डोक्यावरचे, भुवयांवरचे केस गळून पडतील. तुमची अन्नावरची वासना उडेल. तुम्हाला भोवतालच्या साऱ्याच गोष्टींची विलक्षण शिसारी येईल. काही दिवसांनी तुम्ही संपूर्ण आंधळे बनाल. तुम्ही नपुसक बनाल. तुम्हाला कॅन्सर होईल आणि खंगत खंगत एक दिवस तुम्ही या जगाचा निरोप घ्याल. ही काही बागुलबोवाची गोष्ट नव्हे. हे किरणोत्सर्गाचे शास्त्रीय स्वरूप आहे.

चीनने अगदी शेवटी शेवटी ज्याचा स्फोट केला, तो किलोटन बाँब घ्या. त्याच्या उष्णतेमुळे होणारे नुकसान काही फार नसेल. पण या किलोटन बॉम्बमुळे होणारा किरणोत्सर्ग मात्र खूप असतो. तो सुरू होण्यास काही तासांचा अवधी लागेल. आपणाकडे वाहतुकीची सुसज्ज यंत्रणा असेल तर त्या भागातील लोक आपण तेवढ्या वेळात हलवू शकू. कदाचित काही राष्ट्रांजवळ अशी व्यवस्था असेल. पण ही व्यवस्था अशा हल्ल्यात अनेकदा कोलमडून पडेल. जमिनीखाली बांधलेली सिमेंटची भली भक्कम आसरास्थाने मात्र उपयोगाला येतील.

## हिरोशिमा आणि नागासाकी

हिरोशिमा आणि नागासाकीच्या स्फोटात एक गोष्ट उघड झाली. स्फोटामुळे केवढीही उष्णता आणि केवढाही झंझावात निर्माण झाला तरी भूगर्भात त्याचा परिणाम होत नाही. अगदी बॉम्ब फुटला त्याच्या जवळच्या एका मैलाच्या वर्तुळात (त्याला 'ग्राउंड झिरो' असे म्हणतात). जमिनीखाली सारे आलबेल होते. विजेच्या तारा, त्यांची मांडणी, पाण्याचे नळ, गॅसचे नळ, साऱ्या गोष्टी भूगर्भात संपूर्ण सुरक्षित होत्या. सिमेंटच्या पक्क्या इमारतींनाही कमी धक्का लागला.

मैदानी प्रदेशापेक्षा डोंगराळ उंचसखल प्रदेशात नुकसान कमी होते. झंझावात आणि उष्णता यांचा परिणाम जवळजवळ निम्म्याने कमी होतो. हिरोशिमा सपाटीवर होते. नागाशिको नागमोडी उतारावर वसलेले होते. हिरोशिमाच्या मानाने नागासाकीत वित्तहानी आणि मनुष्यहानी खूप कमी झाली.

समजा तुम्हाला सूचना मिळाली आणि तुम्ही आसरास्थानात गेलात. त्यानंतर किरणोत्सर्ग सुरू होईपर्यंत येणाऱ्या साऱ्या जणांना तुम्ही आसरास्थानात घ्याल.

पण एकदा किरणोत्सर्ग सुरू झाला की आसरास्थानाची दारे संपूर्णपणे बंद होतील. –मग तुमची कितीही प्रिय व्यक्ती वा केवढाही मोठा अधिकारी चुकून बाहेर राहिलेला असो. तुमची ही आसरास्थाने संपूर्णपणे हवाबंद असतील. पूर्वीपासूनच तेथे बंद नळकांड्यात भरून अन्नाचा आणि पाण्याचा साठा ठेवलेला असेल. आपण अनेक दिवस, कदाचित अनेक आठवडे येथे राहणार आहोत. त्यासाठी साऱ्या सोयी या छोटया शहरात केलेल्या असतील. तुमचे सारे विधी तुम्ही येथेच उरकणार आहात. तुम्हाला वेळ घालवावयास उपयोगी पडतील असे बैठे खेळ आणि पुस्तकेही आत असावीत आणि काही झाले तरी रेडिओसेट आणि वायरलेस सेट या आसरास्थानात हवेतच. या हवाबंद तळघरात तुम्हाला किती काळ राहावे लागणार हे या वायरलेस सेटवरूनच तुम्हाला कळविण्यात येईल. –बाहेरची किरणोत्सर्गाचे मापन करणारी यंत्रणा तुम्हाला ही माहिती पुरवेल.

शनीच्या फेऱ्यात सापडल्यावर, कैलासाधिपती शंकरनाही, साडेसाती संपेपर्यंत गारगोटीच्या रूपात गुहेत लपावे लागले. किरणोत्सर्गांच्या तडाख्यात सापडल्यावर त्याचा जोर संपेपर्यंत त्याच्यापासून संपूर्ण गुप्त होणे एवढा एकच मार्ग आपणासमोर मोकळा आहे.

आता कदाचित आपणाला किरणोत्सर्गाची माहिती देणारी यंत्रणा आधीच्या विध्वंसात नाहीशी होईल. कदाचित शत्रूच्या प्रक्षेपण केंद्रावरून आपणास चुकीची माहिती देऊन आपली दिशाभूल करतील. त्यामुळे काही काळाने आपल्या आसरास्थानातील एखादा माणूस किरणोत्सर्ग मोजावयास बाहेर पाठविणे जरुरीचे आहे. तो माणूस मुखवटा चढवूनच बाहेरच्या वातावरणात प्रवेश करील. बाहेरचा किरणोत्सर्ग जर कमी झालेला नसेल, तर तो माणूस परत आल्यावर आपण त्याला बहुधा आत घेऊ शकणार नाही. आतील अनेकांना वाचविण्यासाठी त्याला बाहेर ठेवून मारावे लागेल.

वाईटातूनही पुष्कळदा काही बरे निघते. युद्धाच्या भाषेत, किरणोत्सर्गामुळे आपला एक फायदा होणार आहे. साध्या रासायनिक बॉम्बमुळे प्रदेशाचा विध्वंस झाला की तो बेचिराख प्रदेश जिंकावयास शत्रू फौजा त्या प्रदेशात घुसत असत. किरणोत्सर्गामुळे या प्रदेशात शत्रुफौजा येऊ शकणार नाहीत. अणुयुद्धात तुम्ही जिवंत राहिलात तर तुम्ही बहुधा पराभूत होणार नाही. 'आधी मोठे अणुयुद्ध होणार नाही. झालेच तर चीनची अफाट लोकसंख्या आणि सुसज्ज सेनादल त्यातून वाचेल.' असा माओचा विश्वास आहे. म्हणूनच तो अणुबॉम्बला कागदी वाघ म्हणतो

## आणखी काही गोष्टी

किरणोत्सर्गाचा जोर कमी झाल्यावर तुम्ही आसरास्थानातून बाहेर याल.–कदाचित छोटे अणुयुद्ध झाले आणि तुमच्या प्रदेशात धोकादायक किरणोत्सर्ग झालेला नसेल तर तुम्ही आसरास्थानातही गेलेले नसाल. मात्र यापैकी कोणत्याही वेळी

तुम्हाला आणखी काही पथ्ये सांभाळावी लागतील. पाणी पिण्यासाठी वापरण्यापूर्वी त्याचा किरणोत्सर्ग तुम्हाला मोजावा लागेल. भाजीपाला काळजीपूर्वक साफ करून नंतरच वापरला जाईल. या साऱ्या गोष्टींसाठी एक वेगळी यंत्रणा प्रत्येक विभागात असली पाहिजे.–हिरोशिमात अशी यंत्रणा असती तर हिरोशिमातील मृत्युसंख्या अनेक हजारांनी कमी झाली असती.

## राष्ट्रीय निर्धार

हे सारे करावयास अफाट मनुष्यबळ आणि अमाप पैसा खर्च करावा लागेल हे खरे. पण घरातला एखादा माणूस मृत्युशय्येवर असताना डॉक्टरकडे गेल्यावर आपण पैशाचा विचार करू शकत नाही. राष्ट्राच्या जिवनमरणाचा जेव्हा प्रश्न असतो तेव्हाही आपली भूमिका वेगळी असू शकत नाही.

चीनने कुटुंबनियोजन रद्द करून आज लोकसंख्या वाढवावयास सुरुवात केली आहे.–काही अमेरिकन मुत्सद्यांच्या मते अणुयुद्धात राष्ट्र जिवंत ठेवण्याचा त्यांचा तो प्रयत्न आहे. अमरिकेतही, अगदी न्यूयॉर्कसारख्या शहरात केव्हाही भर दुपारी भोंगे वाजवून लोकांना विमान हल्ल्याची रंगीत तालीम देतात. ' ब्लॅक आउट ' पासून आसरास्थानापर्यंत साऱ्या गोष्टींचा लोकांना सराव देतात.

......आणि मुंबईत पाकिस्तानच्या युद्धाच्या वेळी भोंगा वाजला की विमान बघावयास आम्ही रस्त्यात जमत होतो. भूकंपाची लोकांना खबर देण्यास सरकारने एखादी यंत्रणा उभारली तर त्यानेच आम्ही अधिक घाबरतो.–आपल्याकडच्या जनसमुदायाला या गोष्टी शिकविणे कठीण असेल. पण सारे पक्ष निवडणुकीचा प्रचार जेवढ्या जोमाने करतात तेवढ्या जोमाने हे काम अंगावर घेतील तर यात अशक्य काय आहे ? आकाशवाणी, सिनेमा, वृत्तपत्रे आणि आपला निर्धार यांनी सुसूत्रपणे काम केले तर हे सहज शक्य आहे.

–पुराणात एक सुंदर गोष्ट आहे. एका ब्राह्मणान देवाला प्रसन्न केले आणि विचारले, " महाराज, मी आपणांला घोडा बळी देऊ का ! " देव म्हणाला, 'नको'. ब्राह्मणाला वाटले देवाला यापेक्षा मोठा बळी हवा आहे. तो म्हणाला, " देवा, मी आपणांस हत्ती बळी देऊ का? " देव ओरडला, " नको. " ब्राह्मणाला वाटले देवाला याही पेक्षा मोठा बळी हवा आहे. तो म्हणाला " मी आपणास सिंह बळी म्हणून देतो. " देव रागाने ओरडला. " मूर्खा, मला फक्त कोंबडा बळी म्हणून लागते ! "

–पुराणातील ही गोष्ट खरी की खोटी कुणास ठाऊक......पण सर्वशक्तिमान अणू जेव्हा केव्हां प्रभंजनासाठी फुटेल तेव्हां त्याची मागणी मात्र यापेक्षा वेगळी नसेल.

O

# फॉस्फोमिन -




# अधिक उत्साह देते.



# भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते.



# शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.




## खरोखर!... फॉस्फोमिन म्हणजे घरकुलांतील आरोग्याचे कारंजे!

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटसयुक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB® ® ®हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50 A/67 Mar

# पुस्तके

## चटकदार ऐतिहासिक कादंबरी

श्री. बीरेनदास यांनी लिहिलेल्या बंगाली कादंबरीचा हा छोटासा अनुवाद राष्ट्रभाषा सभेने प्रकाशित केला आहे. भारतीय व विदेशी भाषांतील लोकप्रिय कादंबऱ्या अनुवादरूपाने मराठी वाचकांना सादर करण्याच्या विश्ववाणी कादंबरी मालेतील हे तिसरे पुष्प आहे. मूळ कादंबरीचा हा शब्दशः अनुवाद आहे की संक्षिप्त अनुवाद आहे हे प्रकाशकांनी दिलेले नाही. कादंबरीतील निवेदनाचे स्वरूप मात्र फारच धावते असल्यामुळे ते संक्षिप्त अनुवादासारखे वाटते.

प्लासीच्या लढाईमध्ये नबाब सिराजउद्दौल्याचा विश्वासघाताने पराभव करून मीर जाफरला नबाबाच्या गादीवर बसविणाऱ्या इंग्रजांच्या विविध कारस्थानांना, अत्याचारांना आणि दडपशाहीला खंबीर विरोध करण्यास उभ्या ठाकलेल्या तेजस्वी ब्राह्मणाची ही कथा. मीर जाफरला गादीवर बसविल्यानंतर त्याला आपल्या हातचे बाहुले करून यथेच्छ लूट करण्यास इंग्रजांनी प्रारंभ केला. इंग्रजांचाच डाव त्यांच्यावर उलटवून दाखविण्याचे धाष्टर्य मीर जाफरचा जावई मीर कासीम याने थोडेफार दाखविले. तथापि वृद्ध मीर जाफरला हाताशी धरून इंग्रजांनी त्याचे बेत धुळीस मिळविले. या सर्व गदारोळात सतत सत्याच्या आणि न्यायाच्या बाजूने उभा राहिला तो फक्त नन्दकुमार. हुगळीला फौजदार असणाऱ्या या तेजस्वी ब्राह्मणाने, नबाबाची विनाकारण गैरमर्जी होऊनसुद्धा त्याला न्यायाचा मार्ग दाखविण्यात कमतरता केली नाही. अखेरीस इंग्रजांच्या दुष्ट, कुटिल नीतीमुळे वैतागलेल्या वृद्ध मीर जाफरला नन्दकुमारचे खरे महत्त्व कळले आणि नन्दकुमारची दिवाणपदी नेमणूक करून राज्याची सर्व सूत्रे त्याने त्याचे हाती दिली. हाती अधिकार येताच नन्दकुमारने इंग्रजांचा अन्यायी जुलूम कह्यात आणून प्रजेला भीतिमुक्त आणि अन्यायमुक्त केले. वॉरन हेस्टिंग्जच्या दुष्कृत्यांविरुद्ध भरपूर पुरावा जमवून त्याने ब्रिटिश कंपनीकडे त्याचेविरुद्ध न्याय मागितला तेव्हा अपमानित झालेल्या व संतापलेल्या हेस्टिंग्जने नन्दकुमारविरुद्ध बनावट खटला उभारून खोटे

कागद केल्याचा आरोप त्याचेवर शाबित केला आणि तत्कालीन कायद्यानुसार नन्दकुमारला फाशीची शिक्षा देण्यात आली.

हा सर्व कथाभाग या कादंबरीत आलेला आहे. कथानक ऐतिहासिक असल्यामुळे त्याला आपोआपच आकर्षकपणा लाभलेला आहे. त्यातून या कादंबरीच्या कथानकाचा काळ, पात्रे, प्रसंग आणि परिस्थिती आजवरच्या मराठी ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्राहून पूर्ण भिन्न असल्याने या आकर्षणात नावीन्यजनित औत्सुक्यांची भर पडलेली आहे. ब्रिटिशांची कुटिल राजनीती आणि घातकी व्यवहारनीती, एतद्देशीय नबाबांचा दुबळेपणा, भेकडपणा नि स्वार्थांधता, व्यापारी शेठ-सावकारांची नफातोटा पाहण्याची देशद्रोही वृत्ती आणि या साऱ्या पार्श्वभूमीवर उजळून उठणारे नंदकुमारचे तेजस्वी व्यक्तिमत्त्व यांचे दर्शन कादंबरीच्या कथानकातील प्रसंगांमधून घडते. कथानकाचा ओघ इतिहास जसा घडला, तसा सरळधोपटपणे वाहात जातो. उत्कंठावर्धकतेसाठी अथवा रसाभिव्यक्तीसाठी लेखकाने त्यात खास काही प्रयोग केले आहेत असे दिसत नाही. मूळ कथेतच रंजकता आणि रोमहर्षकता आहे असे वाटल्याने तसा प्रयत्न झाला नसावा.

सिराजउद्दौला, नंदकुमार, मीर जाफर, मीर कासीम, हेस्टिंग्ज, क्लाइव्ह आणि शेठ-सावकार ही या कादंबरीतील मुख्य पात्र. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण होण्यासाठी लेखकाने खास तोशीस घेतलेली नाही, ऐतिहासिक प्रसंगांच्या वर्णनांतून या व्यक्तींचे स्वभावविशेष आणि मूल्यनिर्देश स्पष्ट होत गेलेले आहेत.

प्रसंगांची वर्णने लेखकाने रंगून, रंगवून केलेली नाहीत, त्यामुळे ती रसाळ झालेली नाहीत. ती हकीकतवजा वाटतात. कित्येक ठिकाणी तपशिलाची सूक्ष्मता मात्र जोपासण्यात आलेली आहे. इतिहासातील एका महत्त्वपूर्ण आणि वेधक कालखंडाची ही गोष्ट आहे; आणि प्रसंगवर्णनात नाही तरी गोष्ट सांगण्याच्या ओघात रंगून लेखकाने सांगितली असल्याने ती चटकदार झालेली आहे. त्यामुळेच, इंग्रजांच्या लहरीवर वरखाली झुलणारा मीर जाफर, निरनिराळी कारस्थाने नि त्यांचा पाडाव, नंदकुमार आणि हेस्टिंग्ज यांच्यातील चढाओढ वगैरे भाग आकर्षक झालेला आहे. संवादलेखनही कथेच्या ओघाशी मिळून जाणारे व सहजसुंदर आहे. त्यात तत्कालीन शब्दांचे प्राबल्य ठेवून वातावरणाची निर्मिती करण्याचा प्रयत्न मात्र झालेला नाही.

इतिहासातील फार महत्त्वाचा. पण आजवर मराठी साहित्यात उपेक्षिला गेलेला कालखंड लेखकान–अनुवादकाने–या निमित्ताने वेधक बनविला आहे हे अभिनंदनीय आहे. शालेय विद्यार्थ्यांस पुरवणीवाचन म्हणून ही कादंबरी मोलाची ठरावी.

**– निशिकांत मिरजकर**

**[ ' हुतात्मा नन्दकुमार ' – लेखक : श्री. बीरेनदास – अनुवादक : श्री. प. स. देसाई – महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा प्रकाशन, मूल्य रु. ४, पृष्ठे १९४. ]**

काही जुने काही नवे

# राक्षसाची हद्दपारी

रामायणातील ही गोष्ट आहे. राम–लक्ष्मण धनुर्विद्या शिकत होते. राजा दशरथाच्या हाती सगळी सत्ता होती. अशा वेळी ऋषींनी अरण्यात यज्ञ सुरू केला. लवकरच राक्षस त्या यज्ञात त्रास देऊ लागले. यज्ञकर्म नीट पार पडेनात. तेव्हा विश्वामित्र ऋषींनी राजाकडे निरोप पाठवला. हे राजा राक्षस या भूमीत येऊन आम्हांला त्रास देत आहेत. तरी तू याचा बंदोबस्त कर.

दशरथाने आपल्या मंत्र्यांना सल्ला विचारला.

एक मंत्री म्हणाला, "हे राक्षस तेथील लोकांना मदत करतात, पैसे वाटतात, शेतीसाठी बी–बियाणे देतात असं मी ऐकलं आहे. आपलं अन्नधान्याचं उत्पादन वाढवायचं असेल तर राक्षसांना तिथंच राहू देणं इष्ट होईल!"

दुसरे मिनिस्टर बोलले,

"आपल्या राज्याची जी घटना आहे तीनुसार कुणीही आपल्या राज्यात येऊ शकतो आणि राहू शकतो. मानव, दानव, भुतेखेते–कोणालाच आपल्याकडे मज्जाव नाही. आपले राज्य धर्मनिरपेक्ष आहे. राक्षस लोक मानवांना बाटवून राक्षस करत असतील तर खुशाल त्यांना तसं करू द्यावं. पण धर्मनिरपेक्षता सोडू नये. हे फार उच्च तत्त्व आहे."

दशरथानं सुमंताला सल्ला विचारला तेव्हा तो म्हणाला–"माझ्याकडं नागरिकांच्या सतत तक्रारी येत आहेत. शिवाय आपल्या गुप्तहेरांचा रिपोर्ट असाच आहे की, हे राक्षस लोक पक्के लुच्चे आहेत, राज्याला धोका आहे नक्कीच."

सुमंताचे हे बोलणे एकून दशरथ राजा थोडा विचारात पडला. पण सगळ्यांनीच त्याला घटनेची आणि धर्मनिरपेक्षतेची आठवण करून दिल्यावर त्याने विश्वामित्राला कळविले की, आम्ही या प्रकरणी काहीही करू इच्छित नाही. सबब प्रकरण फाईल.

तोपर्यंत विश्वामित्र ऋषी राजधानीत येऊन पोचले होते. संतप्त होऊन ते

म्हणाले, " राजा, तू नुसतं राम-लक्ष्मणांना माझ्याबरोबर दे. मग त्या राक्षसांचं मी पाहून घेतो." पण शांततामंगाच्या नावाखाली दशरथानं ही गोष्ट मान्य केली नाही.

निराश होऊन विश्वामित्र परत आले. त्यांनी राक्षसांना हाकलण्यासाठी चळवळ सुरू केली. उलट विश्वामित्र हा जातीयवादी मनुष्य आहे असा अरडाओरडा राक्षसांनी आणि त्यांच्या बाटग्या राक्षस अनुयायांनी केला. जिकडे तिकडे गोंधळ उडाला. कोणी दशरथाकडे शिष्टमंडळे नेली. कोणी सुमंताकडे अर्जविनंत्या केल्या. शेवटी फारच दडपण आले तेव्हा सुमंताने राक्षसांच्या हकालपट्टीची आज्ञा सोडली. राक्षसांनी दशरथावर दडपण आणून ती रद्द करवून घेतली. मग सुमंताने पुन्हा ती ऑर्डर दोन महिन्यांपुरती तह-कूब करून घेतली. दोन महिन्यांत खूपच धामधूम उडाली. दोन्ही बाजूंनी प्रचाराचा धूमधडाका उडाला. राक्षसांजवळ पैसा भरपूर, त्यामुळे त्यांनी पगारी कुत्री बाळगली होती. ती सगळी विरुद्ध लोकांच्या अंगावर धावली.

पण सुमंत सगळे धैर्य एकवटून कसेबसे म्हणाला, " छे: छे: ! दोन महि-न्यांनी राक्षसांना जावेच लागणार. मी एकदा आज्ञा दिल्यावर महाराज ती रद्द करतील असे मला वाटत नाही."

दोन महिने उलटले.

राक्षस मंडळी चालती झाली. जाताना ती हसून म्हणाली, " आम्ही केवळ महिन्याभराच्या सुटीवर चाललो आहोत. महिन्याभरात आम्ही परत येतो की नाही पाहा !"

लोकांना धक्काच बसला. तेव्हा खुलासा करण्यासाठी दशरथमहा-राजांच्या कार्यालयातला प्रवक्ता म्हणाला, " सुमंताच्या इच्छेनुसार राक्षसांना हद्दपार वगैरे करण्यात आलं आहे. आता बाटग्या लोकांच्या इच्छेनुसार राक्षसांना पुन्हा परत येता येईल असं आम्ही आश्वासन देतो. वाटल्यास राक्षसांनी सुमंताच्या अधिकार-क्षेत्रात राहू नये. राज्यातील दुसऱ्या कोण-त्याही भागात राहून आमच्या शेतीची सुधारणा करावी. राज्यात कुठंही बाटग्या लोकांना काही तोटा नाही. तेव्हा राक्षसांना चुकल्याचुकल्यासारखं वाटायचंही काही कारण नाही. दोघांनाही खूष करण्यासाठी आम्ही ही नामी तडजोड काढली आहे."

तात्पर्य — राम-लक्ष्मणाचे धनुष्य काढून टाकले तर रामायणात अशाच गोष्टी आढळतात.

**द. मा. पुराणिक**



*योगायोगाने मुलांच्या खेळण्यातून अंबाल्यात एक खुनाची हकिकत आकार घेऊ लागली होती. विहिरीतून काढलेलं प्रेत भारोळीच्या जहागिरदारांच्या मुलाचं–जसपालसिंगाचं होतं. त्याची रूपसुंदर पत्नी आणि तिचा आतेभाऊ मोहिंदरपाल यांच्या विशेष सख्यातून जसपालचं काळंकुट्ट भविष्य घडत होतं. वरवर त्याच्या धंद्यात भागिदारी करणाऱ्या मोहिंदरवरून ५ फेब्रुवारी १९५० च्या रात्री जसपालचं परविंदरशी कडाक्याचं भांडण झालं. ती त्याच्या आयुष्यातली शेवटची रात्र ठरली. वरिष्ठ पोलिस अधिकारी या खुनाच्या शोधासाठी अंबाल्याला रवाना झाले.*

मॅजिस्ट्रेटचा नातू, जहागिरदारांचा मुलगा आणि डेप्युटी पोलिस कमिशनरचा जावई असलेल्या जसपालसिंगाचा अमानुष खून झाला होता! या 'बड्या' व्यक्तीच्या खुनाची चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या 'वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यां'ची कामगिरी कठीण होऊन बसली होती. खून होऊन एक महिना होऊन गेला होता. खुनाचा पुरावा नष्ट करून टाकण्यासाठी 'गुन्हेगारा'ला बराच वेळ मिळाला होता. तशातच हे वृत्तपत्रांचे संपादक! मूर्ख कुठचे! विहिरीत प्रेत सापडल्याची बातमी सनसनाटी असेल, पण ती वाचून 'गुन्हेगार' सावध होईल त्याचं काय? अधिकारी बराच विचारात पडला. गुन्ह्याच्या चौकशीची दिशाच ठरवणं कठीण होऊन बसलं. उगाच गंमत म्हणून कुणी कुणाचा खून करीत नाही. प्रत्येक खुनामागे काही ना काहीतरी हेतू असतो ( Motive ). कधी पैसा, कधी बाई, कधी वैमनस्य तर कधी बदला! कुणी केला असेल जसपालसिंगाचा खून? प्रचंड उत्पन्न असलेल्या जहागिरीचा एकमेव वारस कमी करावा म्हणून चुलत नात्यांपैकी कुणी? चोरीच्या हेतूने घरातल्या नोकराने? जसपालसिंग स्वतःच लफडेबाज होता की काय? त्याच्यावर कोणी सुंदरी बेहद्द खूष होती आणि तिच्या अभिलाषेने त्याच्याशी स्पर्धा करणाऱ्या कोणी हा खून केल




# रूपवती भार्या शत्रू:!

३ । । ॲड. माधव कानिटकर । । ३

असेल काय? तसं असेल तर त्याला दररोज पाहणाऱ्या प्रत्यक्ष त्याच्या नोकरांना त्याच्या चारित्र्याबद्दल काहीतरी माहिती असेलच. चौकशीच्या सूत्राचे टोक पकडायचे असेल तर जसपालसिंगाला चांगले ओळखणारे–विशेषत: एक महिन्यापूर्वी त्याला जवळून पाहिलेल्या–कुठल्या तरी व्यक्तीला गाठले पाहिजे! चौकशीला वेळ लागला तरी चालेल, पण खरा खुनी सुटता कामा नये व निरपराध व्यक्तीला उगाचच त्रास होता कामा नये! कुणालाही बरोबर न घेता 'वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्या'ने जीप बाहेर काढली. जीप चालविताना ते एकीकडे विचार करीत होते... "जसपालसिंगाच्या प्रेतावर कुठल्याही शस्त्राची जखम नव्हती! कुठलंही शस्त्र न वापरता खून करता येतो? येतो! विषप्रयोग! जसपालसिंगाला कुठलं तरी जालीम विष दिलं असलं पाहिजे. माणसाचा मृत देह ट्रंकेत घडी घालून घट्ट बसविणं, ती ट्रंक दूर विहिरीत नेऊन टाकणं, हे काम फक्त एक व्यक्ती करणं शक्य नाही! कमीत कमी दोघं–तिघं तरी गुन्हेगार असले पाहिजेत! आणि प्रेताची घडी घालण्याच्या 'कार्यक्रमा'ला लागणारा एकान्त व सुरक्षितता या दृष्टीने सगळ्यात चांगली जागा म्हणजे जसपालसिंगाचाच बंगला! असली कामं कुणी बाहेर जाऊन करणार नाहीत. जसपालसिंगाचा खुनी त्याच्या घरातच किंवा त्याच्याकडे नेहमी येणारा–जाणारा असला पाहिजे!" विचार करता करताच वरिष्ठ अधिकाऱ्याची जीप अंबाल्याच्या दिशेने वळली आणि जसपालसिंगाच्या बंगल्याच्या पोर्चमध्ये येऊन थांबली, त्या वेळी दुपारचे १२ वाजले होते! पूर्ण गणवेष चढवलेला तो मुरब्बी पोलिस अधिकारी आपल्या रुबाबाला शोभेल अशा तऱ्हेने आत्मविश्वासाने पोर्चला लागून असलेल्या पायऱ्या चढून हॉलमध्ये आला. बंगल्यात सर्वत्र सामसूम होती...पण चौकशीला

गेलेल्या पोलिस अधिकाऱ्याला कधी फार वेळ थांबावे लागत नाही. आपल्या घरात 'इन्पेक्टर' कशासाठी आला, याचीच चौकशी करण्याकरता कुणी ना कुणी तरी लगेच बाहेर येतोच! वरिष्ठ अधिकारी पायऱ्या चढत असतानाच "मालकां"च्या झोपलेल्या मुलांना वारा घालीत असलेल्या लक्ष्मीने त्यांना पाहिले होते. 'पोलिसा'ला बघून ती घाबऱ्या घुबऱ्या खाली हॉलमध्य आली...!

"बसा साहेब! मी वर जाऊन बाईसाहेबांना खबर देते!"

"खबर नंतर दे!...आधी इकडे ये!"

"तू कोण आहेस?"

"मी...मी...मी...लक्ष्मी...या घरची मोलकरीण."

"काय काम करतेस तू?"

"मी मुलं सांभाळते!"

"अच्छा? आणखी किती नोकर आहेत इथं?"

"करमचंद आहे—साहेबांचा खास नोकर!"

"आता कुठं आहे तो?"

"बागेत काम करतोय."

इन्स्पेक्टर साहेबांच्या अचनाक सरबत्तीने लक्ष्मी अक्षरशः थरथर कापू लागली होती! आणि ती सरबत्ती जरा थांबल्यासारखी वाटल्याबरोबर 'बाईसाहेबां'ना खबर देण्याचे निमित्त करून तिने आपली कशीबशी सुटका करून घेतली!

उजव्या हातातल्या शिशवीच्या काळ्याभोर लाकडाचा दंडुका डाव्या हाताच्या पंजावर तालबद्ध आपटीत वरिष्ठ अधिकारी हॉलमध्ये फिरू लागले. लक्ष्मीच्या एकंदर वागणुकीवरून त्यांना अशी शंका आली की, हिला "काही तरी" ठाऊक असलं पाहिजे! त्यांच्या जाडजूड बुटांचा आवाजच फक्त तिथल्या शांततेचा भंग करीत होता!

...अचानक जिन्यावर पावले वाजली. वरिष्ठ अधिकाऱ्याने वळून पाहिले—

पांढऱ्या शुभ्र साडीचा पदर डोक्यावरून घेऊन आपल्या सुडौल शरीराला सांभाळीत खुद्द पर्लविंदर कौर खाली येत होती. खाली आल्यावर फक्त एकदाच तिने वरिष्ठ अधिकाऱ्याकडे मान वर करून पाहिले...आणि अधिकारी तिच्या मुग्ध सौंदर्याच्या अनुपम दर्शनाने थक्क झाला! आपल्या लांबसडक रक्तवर्ण नाजूक बोटांची मूठ आवळून तिने धनुष्याकृती ओठांच्या कोपऱ्याजवळ दाबून धरली आणि एक अस्फुट चित्कार करून ती ढळढळा रडू लागली! रडतानादेखील ही इतकी छान दिसते, मग हसताना काय असेल! असा विचार तशाही स्थितीत अधिकाऱ्याच्या मनात येऊन गेला. मात्र त्यांच्यातल्या 'अधिकारा'ला ते विसरले नव्हते. स्वतःला सावरून घेत पर्लविंदरकौरच्या जवळ जाऊन सहानुभूतीच्या गंभीर आवाजात त्यांनी म्हटले—

" I am sorry...मिसेस् ऽऽऽअं ऽऽजसपाल, तुम्हांला दुःख होणं साहजिक आहे...आपल्याला त्रास देण्याची माझी इच्छा नाही...पण मला माझं कर्तव्य करायलाच पाहिजे. तुमच्या दोन्ही नोकरांना आताच्या आता माझ्याबरोबर पोलिस स्टेशनवर यावं लागेल. तुम्ही काळजी करू नका. वाटेल ते कष्ट करून मी गुन्हेगाराला पकडल्याशिवाय राहणार नाही. (Not a single stone will be left unturned ! )

...कुठल्या तरी आंतरिक प्रेरणेने पर्लविंदरकौरने विचारले, " मलाही यावं लागेल पोलिस स्टेशनवर ?"

" तूर्त तरी नाही ! तशीच जरूर वाटली तर बोलवीन तुम्हांला किंवा तुमच्या मनाला फारच त्रास होत असेल तर मी स्वतः येईन ! "

" नको नको ! " अशा अर्थाने मान हलवून पर्लविंदरकौर झटकन वळली आणि खाली आली होती, त्याच्या किती तरी पट वेगाने रडत रडत वर निघून गेली !

लक्ष्मी आणि करमचंद या दोन्ही नोकरांना जीपमध्ये घालून वरिष्ठ अधिकारी पोलिस स्टेशनवर आले आणि त्या दोघांना बाहेर बसवून ठेवून त्यांनी चीफ सिव्हिल सर्जनला फोन लावला.

" हॅलो ऽऽ डॉ. खन्ना प्ली ऽऽज. "

" स्पिकींग. "

" गुड आफ्टर नून डॉक्टर !...त्या जसपालसिंगाच्या बॉडीचं पोस्टमार्टेम झालं ?"

" मी स्वतः ते पोस्ट मार्टेम नाही केलेलं, पण माझ्या असिस्टंटचा रिपोर्ट आहे माझ्याजवळ..."

" कुठल्या कारणामुळे त्याला मृत्यू आला ?" (Will you please kindly let me know the cause of death ? )

" विषामुळे ! (It is due to poisoning) प्रेताच्या पोटात पोटॅशियम सायनाईड बऱ्याच प्रमाणात मिळालं. "

आपला अंदाज इतका अचूक ठरेल अशी, खुद्द अधिकाऱ्यालादेखील कल्पना नव्हती ! टेलिफोन डिस्कनेक्ट करून त्यांनी टेबलावरची घंटा वाजवली. अनुभवाने त्यांना ठाऊक झाले होते की, पूर्ण गणवेषात पोलिस अधिकारी एखाद्या ठिकाणी जाऊन आला की, खरा गुन्हेगार " साहेबाला आपला संशय तर आला नाही ना ?" या शंकेने हमखास त्याच ठिकाणी जाऊन येतो ! किंवा तिथे एखादी घटना अशी घडते की, ती ' आरोपी 'ला पोलिसांच्या जाळयात सहज फेकून देते !

आत आलेल्या हवालदाराकडे पाहात वरिष्ठ अधिकाऱ्याने हुकूम दिला, "हवालदार ! "

" यस ऽऽ सर ! "

" आताच्या आता जीप घेऊन जसपालसिंगाच्या बंगल्याजवळ जा ! बंगल्या-पासून गाडी लांब ठेव ! जाताना साधे कपडे करून जा ! आणि तिथे कोण येतो, कोण जातो, याची मला दोन–तीन तासांनी खबर दे...आणि हे बघ...त्या बाई बाहेर बसल्यात ना त्यांना आत पाठवून दे !"

...थरथर कापत लक्ष्मी कशीबशी साहेबांच्या पुढे येऊन उभी राहिली आणि तिथलं वातावरण बघून रडायला लागली ! वरिष्ठ अधिकाऱ्याने कागद पुढे ओढले आणि प्रथम तारीख टाकली, १० एप्रिल १९५० ! जसपालसिंग खून खटल्यातील पहिल्या साक्षीदाराची जबानी खुनानंतर तब्बल २॥ महिन्यांनंतर लिहून घेतली जात होती ! लक्ष्मीकडे आपुलकीने पाहत अधिकारी म्हणाला, " बाई ! रडू नका ! आम्ही काही शत्रू नाही तुमचे. मी काही माहिती विचारतो, तेवढी सांगा आणि घरी जा–!"

शवटच्या ' घरी जा 'ने लक्ष्मीला बराच धीर आला !

" पाहा बाई ! तुमचे जसपालसिंगसाहेब दारू–बिरू पीत असत ? "

" नाय बा. "

" ...मग कधी बाहेरून पिऊन यायचे ?"

" न्हाई–कद्धीच न्हाई. "

" त्यांची कोणी एक मैत्रीण होती म्हणे ?"

" नाय बा ! त्या बाबतीत ो देवमाणूस होता. पुष्कळदा बाईसाहेब बाहेर जायच्या. सरदार एकटेच बंगल्यात असायचे. मी पण एकलीच असायची (!) पण त्यांनी कधी मान वर करून माझ्याकडे पाहिलं नाही !"

" तू सायबांना शेवटी केव्हा पाहिलंस ?"

" भांडण झालं त्या दिवशी. "

" कुणाबरोबर ?"

" बिबीबरोबर !"

" काय झालं भांडण ?"

" नेहमीचंच !"

"नेहमीचचं ? "

...... आणि या प्रश्नावर लक्ष्मी चक्क लाजली ! हळूहळू लाज सोडून तिने सर्व गोष्टी बोलायला सुरुवात केली. आवश्यक होत तेवढं वरिष्ठ अधिकारी लिहून घेऊ लागला !

"आता सांगू नये साहेब ! पण सांगते ! मोहिंदरपालसिंग म्हणून बिबींचा एक आतेभाऊ आहे. तो नेहमी बाईसाहेबांना भेटायला यायचा. त्यांची भानगड होती साहेब ! "

" कशावरून ? "

"आता कसं सांगू तुम्हाला साहेब ! मी आज ४ वर्षं नोकरी करते ना तिथे ! मोहिंदरपालसिंग बाईसाहेबांची नेहमी थट्टामस्करी करीत. अंगाला हात लावून ! आम्हाला बघायला लाज वाटायची ! आणि बाहेसाहेब बी लई त्याच्या-वर खूष ! एकदा तर ती दोघं एकाच पलंगावर झोपलेली मी स्वत: पाहिलं ! सरदारांना बाईचा संशय होता म्हणून भांडण झालं ते मी ऐकलं"

"मग ? भांडणानंतर तू त्यांना पुन्हा केव्हा पाहयलस ?"

-पाह्यलच नाही ! भांडण रात्री झालं होत. दुसऱ्या दिवशी सकाळी बिबींनी मला मुलांना घेऊन बाजाराला पाठविली कारण करमचंद दुसऱ्या कामाला बाहेर गेला होता. साहेब अजून उठलेच नव्हते (!) घरात फक्त बिबी आणि मोहिंदर-पालसिंग होते. मी बाजारातून आल्यावर बिबीनी मला सांगितलं की 'कालच्या भांडणामुळे रागवून सरदार आत्ताच दौऱ्यावर गेले. आता याच प्रवासात ते जहा-गिरीच्या कामासाठी अमृतसर–फिरोजपूर–पतियाळा–दिल्ली अशी लंबी सफर करून येतील ! चमत्कारिकच आहे बाई स्वभाव त्यांचा ! रागावले म्हणजे प्रवासाला जातात !'"

"मग आले का परत सरदार ?"

"छे: छे: आजपर्यंत आलेले नाहीत आणि आता तर ..." असं म्हणून लक्ष्मीन डोळयाला पदर लावला !

"बरं ! आता असं सांग, सरदार घरातून नाहीसे झाल्यावर बिबींचा आतेभाऊ पुन्हा केव्हा आला होता ?"

"आठ दिवसांनी आला होता ! येताना तो एक जीप गाडी घेऊन आला. त्यात दोन शीख बसलेले होते. त्यांना बाहेरच ठेवून तो आत आला. बिबी व्हरांड्यात वाट पाहात उभ्या होत्या. आल्याबरोबर तो बिबींच्या बरोबर त्यांच्या खालच्या खास खोलीत गेला आणि मी स्वयंपाकघरात गेले !"

"कशासाठी ?"

"साहेब तुम्ही रागवू नका ! पण आता खरं सांगते. बिबींची खालच्या मजल्या-वरची खोली स्वयंपाकघराला लागून आहे आणि दरवाज्याला कडी घालून बिबी आणि मोहिंदरपालसिंग त्या खोलीत गेले की मधल्या दरवाजाच्या फटीतून मी त्यांचं दोघांचं 'प्रेम' चोरून पाहात असे ! त्या दिवशी मात्र ती दोघं जवळ जवळ आलीच नाहीत ! दोघांनी मिळून एक मोठी लोखडी ट्रंक फरफटत कशीबशी दरवाजापर्यंत आणली ! नंतर मोहिंदरपालसिंगने दरवाजाची कडी काढली आणि त्याने बाहेर मोटारीत बसलेल्या दोन शिखांना आत बोलावले ! नंतर ती दोघं, साहेबांचा खास नोकर करमचंद, आणि ते दोन शीख या सगळयांनी मिळून ती ट्रंक मोटरमध्ये घालून कुठेतरी नेली !"

"आता फक्त एकच प्रश्न ! तुझ्या साहेबांचं प्रेत ट्रंकेत मिळालं ती ट्रंक विहि-

रीत मिळाल्याची बातमी तुला केव्हा समजली ? ”

“ पेपरला आलं होतं ! करमचंदने मला वाचून दाखवलं ! ”

“ मग तू लगेच पोलिसांना का नाही सांगितलस की ती ट्रंक या लोकांनी नेताना मी पाह्यलं म्हणून ? ”

“ बिबींनी मला बजावून ठेवलं होतं की त्या ट्रंकेबाबत कुठे काही बोलू नको म्हणून ! ”

लक्ष्मीला घरी जायची परवानगी देऊन वरिष्ठ अधिकाऱ्याने करमचंदला आत बोलावले ! 'ती' लोखंडी ट्रंक बाहेर नेली गेली तेव्हा करमचंद तिथे हजर होता. ट्रंकेत प्रेत आहे हे त्याला ठाऊक होतं का ? असेल तर तो स्वतःच या खून खटल्यात आरोपी होत होता. त्या ट्रंकेत सापडलेल्या प्रेताचे कपडे त्यानेच पोलीस स्टेशनवर ओळखले होते ! तरी त्या वेळी तो काही बोलला नव्हता की ही ट्रंक विहिरीत टाकली गेली तेव्हा मी हजर होतो म्हणून ! बदमाश ! असल्या माणसाला आपण या महत्त्वाच्या खून खटल्यात पोलिसांचा साक्षीदार करणार होतो. उद्या कोर्टात फिरला म्हणजे मग ? न जाणो गुन्हेगाराला मदत करण्याकरिता तो मुद्दामच महत्त्वाच्या घटना आपल्या साक्षीत सांगणारच नाही. नव्हे आतापर्यंत त्याने तेच केले होते ! त्याला प्रथम सरळ करायला हवा !

करमचंद आत आल्याबरोबर 'वरिष्ठ अधिकारी' ताडकन खुर्चीतून उठले आणि त्यांनी करमचंदच्या एक सणसणीत मुस्कटात मारली ! टेबलावरचा लाकडी जाडजूड दंडुका उचलून ते पुन्हा त्याच्या जवळ जाऊ लागले.

अचानक झालेल्या हल्ल्याने आणि वेदनेने करमचंद कळवळला ! रडत, ओरडत दोन्ही हातांचे पंजे पुढे करून “ साब, मुझे मारो मत .. मारो मत ” म्हणेपर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्याच्या काठीचे ५-६ फटके त्याच्या खांद्यावर, पाठीवर, हातावर बसले. त्यांचा अनावर राग त्यांच्या डोळ्यांतून ओसंडत होता. मार चुकविण्यासाठी खाली पडलेल्या करमचंदाकडे पाहात साहेब ओरडले “ हवालदार ! याला 'आतल्या खोलीत' न्या ! आणि त्याला घोडी घाला ! हाडं सैल करतो ××× ची ! ”

चार–पाच हवालदारांनी करमचंदाच्या बखोटीला धरून, त्याला लाथ मारून उभा केला ! साहेबांनीच 'कार्यक्रम' सुरू केल्यामुळे आता हवालदारांना करायला हरकत नव्हती ! करमचंद गुरासारखा मार खात केविलवाणा ओरडत होता. पण त्याच्याकडे कोणी लक्ष देत नव्हते. 'चौकशी'(!)च्या वेळी असला प्रकार पोलिस स्टेशनवर नेहमीच घडतो.

करमचंदाला “ आत नेल्यानंतर ” वरिष्ठ अधिकारी १०–१५ मिनिटे मुद्दामच बाहेर थांबले आणि त्यानंतर लाकडी दांडका उचलून ते आत गेले ! त्यांचा अंदाज खरा ठरला. त्यांना दांडक्यासकट नुसतं पाहूनच घामाने भिजलेला, घाबरलेला, करमचंद रडत रडत ओरडला, “ साहेब, मला मारू नका ! मी सगळं खरं सांगतो ! ”

उजव्या हातातलं लोकडी दांडकं हातातच खेळवीत वरिष्ठ अधिकाऱ्याने करमचंदाला बजावले, "करमचंद, नुसतं खरं सांगून भागणार नाही! जे सांगशील ते खरं ठरलं पाहिजे! इथे जे सांगशील तेच कोर्टात सांगायला पाहिजे! याद राख! पोलिसांचा साक्षीदार होऊन जर का कोर्टात फिरलास तर खटला संपल्यानंतर दुसरा कुठला तरी चार्ज ठेवून तुला असशील तिथून घेऊन येईन! आणि मग मात्र दयामाया दाखवणार नाही! तू त्या वेळी गुन्हा केलेला असोस किंवा नसोस! असा मारीन, की हाडं पिंजून जातील!"

शेवटच्या वाक्याने करमचंद चांगलाच घाबरला. न जाणो 'साहेबां'नी त्यांचा बेत आत्ताच अमलात आणायला सुरुवात केली तर? घाईघाईने हात जोडून तो म्हणाला, "तसं होणार नाही साहेबऽऽतसं होणार नाही! मी खरं तेच सांगेन, इथेही आणि कोर्टातदेखील."

अधिकाऱ्याचे काम झाले होते! त्याला 'मोकळा' करून त्यांनी बाहेर आणला आणि करमचंद झरझर बोलू लागला...

"सुमारे २-२॥ महिन्यांपूर्वीची गोष्ट आहे साहेब! साहेबांचे मेव्हणे मोहिंदरपालसिंग यांनी मला त्यांची एक ट्रंक उचलायला मदतीसाठी बोलावले. बिबी आणि मोहिंदरपालसिंग यांनी ती ट्रंक दरवाजापर्यंत खेचत आणली होती. नंतर तिथे असलेले आणखी दोन शीख, मी, बिबी व मोहिंदरपालसिंग यांनी मिळून ती ट्रंक मोहिंदरपालसिंगने आणलेल्या जीपमध्ये ठेवली आणि बंगल्यापासून जवळच असलेल्या कँपात जसपालसिंग साहेबांच्या स्टोअररूममध्ये ठेवली!"

करमचंदाची हकीकत लिहून घेत असताना तो खरं सांगत असला पाहिजे, याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याची खात्री पटली. कारण, एक तर लक्ष्मीने सांगितलेल्या हकीकतीशी ती तंतोतंत जुळत होती. शिवाय, विहिरीत टाकण्यापूर्वी ती ट्रंक अगोदर कुठे तरी नेली गेली असली पाहिजे, याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्याची खात्री झाली होती. प्रेत जाळून टाकण्याचा प्रयत्न केला गेला असावा, असा पुरावा पंचनाम्यात होता! प्रेताच्या चेहऱ्यावरचे मांस जळले होते! कपडे अर्धवट जळले होते! मात्र करमचंदाची जबानी लिहून घेत असताना पोलिस खात्यात अनेक वर्षे काढलेल्या त्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे अंतःकरणदेखील कळवळले. धंद्यासाठी स्टोअररूम घेताना जसपालसिंगाला कल्पना तरी असेल का की, याच स्टोअररूममध्ये आपले स्वतःचेच प्रेत ट्रंकेत घडी घालून 'स्टोअर' केले जाईल?

...मानावर येत त्यांनी करमचंदाला करड्या आवाजात विचारले,

"मग? ती ट्रंक विहिरीत कशी गेली?"

"त्यानंतर १०-१५ दिवसांनी आम्ही 'ती' ट्रंक तिथून हलविली आणि विहिरीत नेऊन टाकली! ट्रंक हलविताना आतून घाण वास `त होता! मी मोहिंदरपालसिंगाला त्याबद्दल विचारलेदेखील. तेव्हा तो मोठ्याने हसला! म्हणाला,

'आतमध्ये उंदीर मरून पडला असेल !' त्यांनी असं म्हटल्यावर बाईसाहेबदेखील हसल्या ! त्या वेळी बाईसाहेबांच्या हातात बंदूक होती ! जीपमधून बाहेर काढून ती ट्रंक छाट खेड्यापासून दूरवर असलेल्या ओसाड विहिरीपर्यंत (unused well) आणल्यावर, ट्रंक विहिरीत पडल्यावर आवाज होऊ नये म्हणून ती ट्रंक आत टाकताना बिबीने हवेतच बंदुकीच्या गोळ्या उडवल्या ! बंदुकीच्या गोळ्यांच्या आवाजात विहिरीतून आलेला आवाज विरून गेला ! लांबून येणाऱ्या खेडुतांना कसलीही शंका आली नाही ! त्यांना वाटलं असावं की, शहरातली माणसं मोटारने ट्रीपला आली आहेत आणि बाईसाहेब पाखरं मारायचा प्रयत्न करीत आहेत."

"करमचंद ! तुझ्या मालकाचं प्रेत त्याच विहिरीत सापडलेल्या त्याच ट्रंकेत मिळालं हे माहिती असून आजपर्यंत तू यातलं काहीच पोलिसांना का सांगितलं नाहीस ?"

"सांगू शकत नव्हतो साहेब ! कारण त्यानंतर बिबींना मी छेडलं तेव्हा त्या मला म्हणाल्या 'खुशाल जा पोलिसस्टेशनवर ! पण लक्षात ठेव की जर का खटला आमच्यावर झालाच तर आमच्याच स्टेटमेंटवर तू पण लटकशील '!"

सुंदर स्त्री व्यभिचार करायला लागली की ती कुठल्या थराला जाईल याचा नेम नसतो हेच खरं ! पांढऱ्या शुभ्र पातळाचा पदर डोक्यावरून घेऊन गंभीर चेहऱ्याने बोलणारी ! रडणारी ! मुग्ध सौंदर्याचा आभास निर्माण होणारं दैवी सौंदर्य असलेली 'अभागी विधवा' हे पलविंदरकौरचं खरं स्वरूप नव्हंत तर ! खरी पलविंदरकौर खटयाळ प्रेयसी होती ! तिचा चंचल नखरा, अर्धोन्मीलित डोळे, गुलाबी ओठांवरचे मादक हसू, शराबी नजर आणि वृत्तीतला उन्माद ! वरिष्ठ अधिकाऱ्याने तर्काने जाणला आणि चौकशीचा धागा नीट पकडून ते करमचंदला म्हणाले,

"करमचंद ! ती ट्रंक उचलणारे जे दोन शीख आले होते त्यांना ओळखू शकशील तू ?"

"होय साहेब ! ते दोघेही कँपातच हमाली करतात."

पुरावा अधिक भक्कम करण्यासाठी साहेबांनी टेबलावरची घंटा वाजवली !

"हवालदार !"

"आत्ताच्या आत्ता याला कँपात घेऊन जा ! आणि तो दाखवील ती दोन माणसं घेऊन या !"

हवालदारबरोबर करमचंद बाहेर गेल्याबरोबर जसपालसिंगाच्या बंगल्यावर नजर ठेवायला गेलेला हवालदार अचानक आत आला आणि साहेबांना एक 'कडक' सलाम ठोकून त्याने म्हटले, "साहेब ! बंगल्यात दुसरं कोणी फिरकलं नाही ! पण खुद्द बाईसाहेब मात्र टॅक्सीने कुठेतरी जाऊन आल्या !"

त्याचं वाक्य संपण्यापूर्वीच भारोलीचे जहागिरदार सरदार रूपसिंग स्वतःच पोलिस स्टेशनवर आले होते ! समोरच्या खुर्चीवर बसत त्यांनी न विचारताच

बोलायला सुरुवात केली " साहेब ! तुम्ही बंगल्यावर जाऊन आलात ?"

" होय ! तुमच्या मुलाच्या खुनाच्या तपासासाठीच गेलो होतो !"

" आता तपास तो काय राहिला ? तुम्ही गेलात आणि पर्लविंदर माझ्याकडे येऊन गेली ! फार फार घाबरलीय ती ! मोहिंदरपालसिंगने आणि तिने मिळून जसपालसिंगाला विष पाजून त्याचा खून केला अशी स्पष्ट कबुली तिने माझ्याजवळ दिली !"

बाहेर पावले वाजली म्हणून अधिकाऱ्याने बाहेर पाहिले. ' ती ' ट्रंक उचलायला मदत करणारे ते दोन शीख करमचंदाने आपल्या बरोबर आणले होते ! करमचंद खरोखरच पोलिसांना खरी मदत करीत होता ! दंडुक्याने योग्य काम केले होते ! जहागिरदारसाहेबांना जरा थांबण्याची विनन्ती करून त्यांनी आलेल्या ह्या दोन शीखांच्या जबान्या आधी घेतल्या.

" मोहिंदरपालसिगाच्या सांगण्यावरून आपण एक घाण वास मारणारी जाडजूड लोखंडी ट्रंक प्रथम बंगल्यातून कँपात, नंतर कँपातून विहिरीत नेऊन टाकल्याचे





बृन्हमुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल अॅण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू अॅण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

दोघांनी मान्य केले. या दोन्ही प्रसंगी मोहिंदरपालसिंगाबरोबर बाईसाहेब होत्या ! व हमालीचे पैसे बाईसाहेबांनीच दिले होते ! त्यांना सर्वांना जायची परवानगी देऊन अधिकाऱ्याने जहागिरदारसाहेबांना आत बोलावले.

" जहागिरदारसाहेब, तुमच्या मुलाची आणि तुमची भेट दररोज होत होती ना ? "

" नाही साहेब ! ७–८ दिवसांनी मी कधीतरी मारोलीहून अंबाल्याला जात असे आणि त्याला भेटत असे ! "

" मग ? शेवटची भेट केव्हा झाली ? "

" तो दिवस नक्की कसा सांगू साहेब ? मला काय माहिती की पुढे हे असं होणार आहे म्हणून ? "

" पण अंदाज ? "

" अंदाजे २।। महिन्यांपूर्वी मी अंबाल्याला गेलो होतो. जसपाल घरात नव्हता ! बहू पर्लविंदर आणि मोहिंदरपाल यांनीच माझे स्वागत केले ! "

" तुम्हांला काही शंका आली ? "

" बिलकूल नाही ! कारण माझं आगत–स्वागत चांगलं झालं. मोहिंदरपाल तिचा भाऊच (!) आहे. शिवाय त्यानेच मला खबर दिली की जसपालसिंग बंदूक खरेदी करण्याकरता अमृतसरला गेलाय म्हणून. "

" आणि तुम्हांला ते खरं वाटलं ? "

" होय ! खरं वाटलं ! कारण जसपालला शिकारीचा नाद होता आणि बंदूक खरेदी करण्याकरता मीच त्याला पैसे दिले होते ! "

" अच्छा ! मग नंतर तुम्ही पुन्हा जसपालला भेटायला कधी गेला ? "

" नंतर पुन्हा १५ दिवसांनी गेलो ! जसपाल घरात नव्हता ! घरात फक्त बहू पर्लविंदर आणि मोहिंदरपाल होते ! "

" मग ? "

" मोहिंदरपालनेच मला माहिती दिली की जसपाल कदाचित परस्पर फिरोजपूरला गेला असेल ! "

" फिरोजपूरला ? आणि यावरदेखील तुमचा विश्वास बसला ? "

" होय ! कारण फिरोजपूरचा मॅजिस्ट्रेट गुरदयालसिंग हा माझ्या मुलाचा मित्र आहे आणि मॅजिस्ट्रेटसाहेबांनादेखील शिकारीचा नाद आहे ! "

" मग तुम्ही नंतर काय केलंत ? "

" मी फिरोजपूरच्या मॅजिस्ट्रेटना ट्रंककॉल केला ! मॅजिस्ट्रेटसाहेब बाहेर गेले होते. त्यांच्या नोकरांनी मला ट्रंककॉलवर सांगितले की, अंबाल्याहून साहेबांचा एक मित्र पाहुणा आला आहे, त्याच्याबरोबरच ते बाहेर गेल्येत ! "

" बरं मग ? "

" म्हणून मी निश्चित झालो ! माझी खात्री पटली की जसपाल फिरोजपूरलाच असला पाहिजे !"

" पुढे ?"

" आणखी ८ दिवसांनी मी पुन्हा अंबाल्याला गेलो. जसपाल घरात नव्हता ! पर्लविंदरकौर आणि मोहिंदरपाल दोघांनी मला सांगितले की जसपाल अजून फिरोज-पूरहून आला नाही !"

" मग ?"

" मग मात्र मी अस्वस्थ झालो ! स्टेशनवर जाऊन तडक फिरोजपूरचे तिकीट काढले आणि...आणि तिथे गेल्यावर मॅजिस्ट्रेटसाहेबांकडूनच मला कळलं की 'गेल्या चार-पाच महिन्यांत जसपाल त्यांच्याकडे गेला नव्हता ! त्यांच्याकडे ८ दिवसांपूर्वी आलेला त्यांचा मित्र राहणारा अंबाल्यालाच होता पण तो जसपालसिंग नव्हे तर गोविंदसिंग' !"

" मग ?"

" मला धक्काच बसला ! आणि जसपालसिंग कुठे असेल या चिंतेने त्याला उद्देशून मी इथल्याच 'डेली-मिलाप' या दैनिकात.' असशील तेथून निघून ये. मी चिंतेत आहे, पैसे हवे असतील, तर कळव ताबडतोब पाठवीन !' अशा अर्थाची जाहिरात दिली !"

" तुमच्याकडे आहे तो पेपर ?"

"आहे ना !" असं म्हणून जहागिरदारसाहेबांनी त्यांच्या बॅगमधून ८ मार्च १९५० चा 'डेली-मिलाप' चा अंक बाहेर काढून साहेबांजवळ दिला. मधल्या पानावर ठळकपणे प्रसिद्ध झालेली त्यांची ती जाहिरात अधिकाऱ्याने नीट वाचली आणि त्यांचे समाधान झाले ! सरदार रूपसिंगांच्या हकीकतीवर कुठल्याही कोर्टाचा सहज विश्वास बसेल. कारण त्यात सत्य आणि सुसंगती आहे. जहागिरदार-साहेबांचा ट्रंककॉल आणि मुलाच्या चौकशीसाठी त्यांचं फिरोजपूरला जाणं याला साक्षीदार होता खुद्द एक मॅजिस्ट्रेट ! ...आणि अशा माणसाजवळ पर्लविंदरकौरने गुन्ह्याची कबुली दिली होती. अधिकारी खूष झाला ! एका प्रेमप्रकरणातून उद्भव-लेल्या खुनाचा आरोप पर्लविंदरकौर व मोहिंदरपालसिंग यांच्यावर ठेवून त्यांना न्यायासनासमोर खेचण्याइतका भरपूर प्राथमिक पुरावा त्यांच्या साक्षीदारांनी त्यांना दिला होता !

त्या दोघांना ताबडतोब अटक करायला हवी होती !

क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी पर्लविंदरकौर व मोहिंदरपालसिंग यांच्या नावे वॉरंटे तयार करवून घेतली आणि किती वाजले आहेत याची पर्वा न करता जवळ जवळ २०-२५ हवालदार बरोबर घेऊन त्यांची पोलिस व्हॅन अंबाल्याच्या दिशेने धावू लागली......

(अपूर्ण)



# पुरंदरच्या बुरुजावरून

सिंह जाळ्यात अडकला ! सिंह फसला !

महाराज फसले ! महाराज जाळ्यात अडकले !

मिर्झा राजा जयसिंहांनी शिवाजी महाराजांना वचन दिलं होतं की, आग्र्याला आपण सुखरूप जाल आणि तेथून सुखरूप परत याल. आपल्या केसालाही धक्का लागणार नाही. मी वचन देतो. आपल्याला दगाफटका होणार नाही

महाराज याच वचनावर आग्र्यास गेले. पण औरंगजेबाने मिर्झा राजाच्या वचनाची पर्वा न करता शिवाजीराजांना बंदीत टाकलं. फुलादखान कोतवालाच्या फौजेचा गराडा महाराजांभोवती पडला. आता यातून सुटणं म्हणजे मृत्यूच्या दाढेतून निसटण्याइतकंच अवघड आहे हे महाराजांनी ओळखलं. महाराज साफ साफ फसले होते. चारशे कोस दूर, शत्रूच्या राजधानीत आपल्या मूठभर शिलेदारांसह आणि नऊ वर्षांच्या शंभुराजासह महाराज औरंगजबाच्या कपटी जाळ्यात अडकले होते.

महाराजांच्याबरोबर जी माणसं होती ती अत्यंत विश्वासू आणि धाडसी होती. त्यांचं महाराजांवर अपार प्रेम होतं. त्या माणसांत सारे तरुण होते. काही प्रौढ होते. पण एकच गडी अगदी कोवळा होता. त्याचं नाव मदारी मेहतर. अवघा पंधरा-सोळा वर्षांचा पोर. मदारी हे त्याचं नाव आणि मेहतर हे त्याचं एक प्रकारचं अडनाव. हा मुसल-

# मदारी मेहतर

## ब. मो. पुरंदरे

मानाचा पोरगा महाराजांच्या नेहमी बरोबर असे. त्याचं महाराजांवर आणि त्यांचं मदारीवर फार फार प्रेम होतं. बापलेकासारखं.

मदारी महाराजांची फार काळजी घेई. अगदी सावलीसारखा तो सन्निध होता. महाराजांचे कपडेलत्ते, हत्यारंपात्यारं, सारं काही तो बघे. महाराजांचा बिछाना तो घालायचा. त्यांना वारा घालणं, त्यांचे पाय चेपणं हे मदारीचं काम. आग्र्याच्या प्रवासात आणि आता बंदीवासातही मदारी महाराजांची काळजी घेत होता. जिजाऊसाहेबांच्या जागी जणू मदारीच महाराजांची 'आई' झाला होता.

महाराजांच्या डोक्यात एकच चिंता सारखी नांगी मारीत होती, या औरंगजेबी मगर मिठीतून सुटायचं कसं? आपण सुटणार का? की इथंच, या कैदेत पिचून पिचून मरणार? या चिंतेत आणि सुटकेच्या चिंतनात दिवस उलटत होते.

आणि एके दिवशी महाराजांच्या डोक्यात 'ती' विलक्षण कल्पना उमलली. आपण असे निसटलो तर? पेटाऱ्यात बसून? कल्पना अशी झकास होती की उत्तुंग चातुर्याचा चाणक्यही चकीत व्हावा.

महाराजांच्या मस्तकात सुदर्शन गतीनें गरगरू लागलं. काय काय करायचं, कसं कसं करायचं, कुणी कुणी, केव्हा केव्हा, कुठं कुठं, काय काय करायचं याचा आराखडा महाराजांच्या मनात रेखाटला जाऊ लागला. निसटून जाण्याची एकूण कल्पना दिपवणारी होती. पण ती अवघडही, तितकीच भयंकर होती. यश मिळालं तर जग थक्क होईल. शाहीर पोवाडे गातील. पण जर का डाव फसला तर धिंड निघेल या आग्र्यातून!

पण अत्यंत विचारपूर्वक व अत्यंत दक्षतापूर्वक हा जिवावरचा डाव खेळायचं महाराजांनी ठरवलं आणि जगदंबेचं नाव घेऊन पहिलं

‘दान’ टाकलं. महाराजांनी आपला सारा बेत आपल्या जिवलगांना समजावून सांगायचा तर तेसुद्धा अवघड होतं. महाराज कैदेत होते ते एका मोठ्या तंबूत. तंबूच्या भोवती फुलादखानाचे पहारे होते. दारावर पहारे होते. पहारेकरी व फुलादखान स्वत: वारंवार तंबूत येऊन पाहत. चोरून कुजबूज करायचीही सोय नव्हती. असंख्य डोळे आणि कान सतत टवकारलेले. अशा चिरेबंदी बंदोबस्तात गुप्त खलबत करायचं तरी कसं? तरी महाराजांनी हा डाव आपल्या जिवलगांना सांगितलाच!

त्यांत महत्त्वाची कामगिरी आली मदारीकडे. कामगिरी अशी की, रोजच्याप्रमाणे महाराजांचे पाय चेपायचेच, पण महाराज पेटाऱ्यात बसल्यावर महाराजांच्या जागी हिरोजी फर्जंद पलंगावर झोपेल, त्याचे पाय चेपत राहायचं. महाराज निघून गेल्यानंतर वेळावेळाने उरलेले लोकही बाहेर जातील. शेवटी उरतील फक्त दोघे. हिरोजी आणि मदारी! त्यांनी सर्वांत शेवटी निघून यायचं.

आणि ठरल्याप्रमाणे शेवटच्या दिवशी महाराजांच्या व शंभूराजांच्या पेटाऱ्यासह मिठाईचे पेटारे निघाले. हिरोजी पलंगावर झोपला. जणू काही हेच शिवाजीमहाराज! मदारी त्याचे पाय चेपीत बसला. पेटारे निघाले. छाताडे धडधडत होती. एक एक क्षण तासातासासारखा वाटत होता. जिभा कोरड्या पडल्या होत्या. अंगाला घाम फुटत होता. पण चेहऱ्यावर भित्रा भाव दिसू द्यायचा नव्हता. संशयसुद्धा येणार नाही अशा बिलंदर मिस्किलपणाने शत्रूच्या पहारेकऱ्यांपुढून निसटायचं होतं. केवढी अवघड कसरत ही! मृत्यूला चाहूल लागू न देता, त्याला जाग न येऊ देता, त्याच्या पापण्यांच्या वळचणीवरून जायचं होतं. पेटारे निघाले. मदारी पलंगावर हिरोजीचे पाय चेपीत होता. पेटारे बाहेर पडत होते. महाराजांचा पेटारा बाहेर पडत होता–पडला–गेला! सारे पेटारे गेले!

महाराज सुटले!

बाकीचे लोकही असेच बेमालूमपणे निसटले. शेवटी उरले हिरोजी आणि मदारी. कल्पना करा, जर ते त्याच वेळी पकडले गेले असते तर काय झालं असतं? पण हिंदवी स्वराज्याच्या शिलेदारांचं भाग्य आणि कर्तृत्व असं तालेवार होतं की, शेवटी हिरोजी आणि मदारीही बाहेर पडले! दारावरच्या मोंगलांना सांगून बाहेर पडले की,

" महाराजांना आत्ताच डोळा लागलाय ! आत जाऊन तकलीफ नका देऊ. मघा औषध आणायला गेलेले लोक अजून का नाही आले ते बघून येतो ! "

" अच्छा अच्छा ! जाव ! "

पसार ! सारेच पसार !

निरनिराळ्या मार्गांनी सारे पसार झाले. दिवस पावसाचे होते. श्रावणाचा महिना. नद्या-नाले भरलेले. रस्ते धड नव्हते. पाठलाग सुरू झाला होता. अंतर तोडायचं होतं चारशे कोसांचं.

अनंत कष्टयातना सोशीत, संकटांना हुलकावण्या देत देत मराठी माणसं निसटत होती. आट्यापाट्यातल्या खेळगड्यांप्रमाणं. अखेर महाराज राजगडावर पोहोचले ! तोफांची सरबत्ती धडाडू लागली. उरलेली माणसंही गडावर दाखल होऊ लागली. शेवटी आले हिरोजी आणि मदारी. दमले भागलेले. काळजीने कोळपलेले. तरीही हसरे. महाराजांना केवढा आनंद झाला. त्यांनी या दोघांचंही अपार कौतुक केलं. पाठी थोपटल्या. महाराजांनी मदारीला पोटाशी धरलं आणि म्हणाले,

" बेटा, केवढं केवढं केलंस ! –किती सोसलंस ! "

खरोखर मदारीने केवढं केवढं केलं होतं. किती किती सोसलं होतं. करा कल्पना ! महाराजांचे पेटारे बाहेर पडताना मदारीने नुसती त्या पहारेकऱ्यांना डोळ्याने खूण जरी केली असती तरी औरंगजेबाने त्याला हिऱ्यामोत्यानं मढवून काढला असता. पण विश्वासघाताचा विचार त्याच्या वा कोणाच्याच मनातही डोकावला नाही.

महाराज मदारीला म्हणाले,

" बेटा बोल तुला काय काय देऊ ? माग माग पोरा हवं ते माग ! "

मदारीने डोळे मिटले. महाराजांच्या कमरेला मिठी घालीत तो म्हणाला,

" महाराज मजला काही नको ! महाराज तुम्ही तख्तावर बसाल, तेव्हा त्या तख्ताची चाकरी मजला सांगावी ! "

खरोखरच पुढं हा मदारी रायगडावर महाराजांच्या सुवर्णसिंहासनाची व्यवस्था ठेवण्याचं काम करीत होता.

O

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## जुलै १३ ते १९ राशि-भविष्य

मेष : पराक्रमस्थानी अनेक ग्रह होते–त्यातील काही ग्रहांनी पक्षांतर केलेले असले तरी पराक्रमातील एकटा मंगळ तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध करायला समर्थ आहे.

या आठवडयातच दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठवावे लागेल, नव्या व्यवसायाशी समरस व्हावे लागेल, आणि विरोधकांचे कितीही हल्ले झाले तरी कार्यक्षेत्रात ठामपणे उभे राहण्याचा निर्धार बाळगावा लागेल.

हे दिवस तसे अनिष्ट नाहीतच, पण साडेसाती आहे याचा विसर पडू देऊ नका. शैक्षणिक क्षेत्रात, औद्योगिक वातावरणात विशष काही करून दाखवण्याची जिद्द बाळगलीत तर तुमचे प्रयत्न निश्चित यशस्वी ठरतील. अपेक्षाभंग होणार नाही अशी मला खात्री वाटते.

दि. १३ ते १५ घाईगर्दीचे दिवस.

वृषभ : रवि–शुक्र पराक्रमात आले आहेत, मंगळही लवकरच तिथे येऊ पाहत आहे. या आत्यंतिक अनुकूल ग्रहस्थितीचा लाभ उठवलात तर तुम्ही हवं ते मिळवू शकाल.

साडेसाती सुरू झाल्यासारखी वाटेल, पण तो शुद्ध बागुलबुवा आहे. त्याला डरायचे मुळीच कारण नाही.

गेल्या १५–२० दिवसांतील सांपत्तिक अडचणी आता क्षणार्धात दूर होऊ शकतील. नोकरीधंद्यातील संघर्ष कुणाच्या मदतीविनाही मिटू लागतील, प्रगतीच्या मार्गातील अडवणूक आपोआप दूर होऊ लागेल.

उत्साहाचा–प्रसन्नतेचा काल सर्वत्र दिसू लागेल. उद्योगधंद्याच्या जुन्या तंत्रात थोडासा बदल केलात तर अपेक्षेबाहेर यश लाभेल. १५ ते १८ जुलै यशलाभ, प्रसिद्धी लाभेल.

**मिथुन :** मिथुन राशीची माणसे काहीशी धरसोड प्रवृत्तीची असतात असा तुमच्यावर अनेकांचा आरोप आहे; तो खोटा आहे हे सिद्ध करण्याची संधी तुम्हांला आताच लाभत आहे. निर्धाराने निर्भयपणाने कार्यप्रवृत्त व्हा. अपेक्षेबाहेर यश मिळेल.

सध्या अनेक ग्रह तुमच्यावर खूष आहेत. त्यांची सहानुभूती मिळवून नव्या औद्योगिक क्षेत्रात उतरलात तर जगाने हेवा करावा असे यश मिळवून दाखवाल.

१८ जुलैच्या रवि–हर्षल योगापासून धनोत्पादनाचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील, सामाजिक प्रतिष्ठेची उंची वाढू लागेल. कला–साहित्याच्या क्षेत्रात नाव घेण्यासारखे कार्य हातून घडेल.

दि. १५–१८–१९ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** हरवलेले स्वास्थ्य शोधून काढण्यासाठी अजूनही तुम्हांला काही दिवस धडपडावे लागेल. सूर्य–मंगळाची सहानुभूती लाभल्याशिवाय अपेक्षेप्रमाणे काही घडेल ही आशाच खोटी.

सांपत्तिक ताण असह्य होऊ लागेल. आपल्या हेतुसिद्धीसाठी नालायक माणसापुढे तोंडे वेंगाडावी लागतील, एकंदरीत आपले सध्याचे दिवस फारसे चांगले नाहीत. पण गुरूला ही आपली अनिष्टता फार काळ मंजूर नाही. नजीकच्या भविष्यकालात सारे चित्र बदलून जाईल. सध्याचे ८–१५ दिवस फक्त जपून काढा. फार मोठ्या जबाबदाऱ्यांचे ओझे उचलण्याचा प्रयत्न करू नका.

दि. १५–१६–१८ प्रयत्न थोड्याफार प्रमाणात यशस्वी व्हावेत.

**सिंह :** गेल्या काही दिवसांप्रमाणे हाही आठवडा आपणांस अनिर्बंध प्रगतीचाच जाणवेल. पण तुमची ही प्रगती न पाहवल्यामुळे, काहीजण तुमच्या मार्गात काटे पसरण्याचा प्रयत्न करतील. त्यांच्या या कृतीचा तुमच्या प्रगतीवर अनिष्ट परिणाम घडेल असे नाही, पण या कालापासून आपणांस पाऊल कांहीसे जपूनच टाकावे लागणार आहे. अवास्तव खर्चाला आळा घालण्याचा प्रयत्न सतत करायला हवा. विरोधक उठाव घेण्याचा प्रयत्न करतील, त्यांना वेळीच ठेचून काढण्याला विसरू नका.

व्यापारधंद्यांत सावधगिरी बाळगा. दूरच्या प्रवासाचे टाळा. दुसऱ्यावर फारसे विसंबून राहू नका.

दि. १७–१८–१९ अनुकूल काल.

**कन्या :** बरेचसे मोठाले व तेजस्वी ग्रह आपल्या लाभस्थानाकडे यायला निघालेले आहेत. काही आलेलेही आहेत. आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. सारे काही झटपट आणि अपेक्षेप्रमाणे घडून यायला लागेल.

निर्माण झालेले संघर्ष मिटतील, हुकलेल्या संधी पुन्हा दिसू लागतील, न बोलणारी माणसे आता आत्मीयतेने विचारपूस करू लागतील. याचा अर्थ तुमचा सारा

अनिष्ट काल इतिहासजमा झाला असं नव्हे–बरेचसे अनकूल आणि थोडेफार प्रतिकूल असे या वेळच्या कालाचे स्वरूप दिसते.

कुणावरही अंधविश्वास ठेवू नका. सारी कामे जातीने करायला प्रवृत्त व्हा.

दि. १६–१७–१९ अनेक गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडतील.

तूळ : ग्रहांची कृपादृष्टी वळली की ईश्वराचीही कृपा होते. आज भाग्यस्थानी असलेले अनेक ग्रह लवकरच दशमस्थानी प्रवेश करतील आणि मग पदोपदी ईश्वरी कृपेचा साक्षात्कार घडू लागेल.

या वेळी सर्वत्र आघाडीवर दिसू लागतील तूळ राशी व्यक्तीच. कला–क्षेत्रातील अनभिषिक्त सम्राट म्हणजे तूळ राशी व्यक्ती. ते जन्मजात कलावंत असतात–आणि जेव्हा जेव्हा आजच्यासारखी सर्वांगाने अनुकूल ग्रहस्थिती त्यांच्या वाट्यास येते तेव्हा तेव्हा आपल्या अंगच्या स्वर्गीय गुणांचा आविष्कार प्रकट करू शकतात.

व्यवसायधंद्यात सर्वोत्तम यश मिळवाल, साहित्याच्या प्रांतात विक्रम करून दाखवाल. दूरच्या प्रवासाचे प्रस्थानही याच वेळी ठेवावे लागेल.

दि. १४–१६–१८ आपल्या अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील.

वृश्चिक : सूर्याने भाग्यस्थानी पाऊल टाकताच तुमचे नष्टचर्य संपुष्टात आल्याचे जाहीर करून टाकले. आता फक्त एकट्या मंगळाची भुणभुण थोडीफार जाणवत राहील, तोही पुढच्याच आठवड्यात अष्टमस्थानातून पसार होणार आहे.

आता तुमच्या नोकरीधंद्याचे स्वरूप आकर्षक दिसू लागेल, वैयक्तिक व कौटुंबिक अनारोग्य सुधारू लागेल, काळवंडलेले वातावरण नाहीसे होऊन सर्वत्र प्रसन्नता दरवळू लागेल.

या आठवड्यातील सूर्य–हर्षल योगामुळेच (१८ जुलै) आपल्यापुढे अनपेक्षितपिणे नव्या संधी उभ्या राहतील. दूरचा प्रवास घडेल. बदली–बढतीची लक्षणे दिसू लागतील.

दि. १७–१८–१९ या दिवसांची नोंद ठेवा.

धनू : तुमच्या सहनशक्तीला आव्हान देणारी परिस्थिती निर्माण होत आहे. सूर्य अष्टमात प्रवेश करीत आहे–मंगळही लवकरच तिथे येणार आहे. स्वास्थ्य एकाएकी हरवेल, प्रतिष्ठा धोक्यात येईल, संपत्ती दिसेनाशी होईल.

या काली कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी १० वेळा विचार करायला हवा. स्वैर मनोवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न केला नाहीत तर पश्चात्तापाशिवाय दुसरे काहीच पदरात पडणार नाही.

एकच एक समाधान. गुरु भाग्यस्थानी आहे हे. तो तसे काही भयंकर होऊ देणार नाही.

नोकरीधंद्यात जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवा.

दि. १५–१७–१९ थोडेफार यश पदरी पडावे.

**मकर :** विरोध–मतभेद–संघर्ष आणि तणातणी हेच या काळाचे व नजीकच्या भविष्यकालाचे स्वरूप आहे. अनेक ग्रह तुमच्या राशीसमोर येत आहेत. आज तरी निदान अंतरीक्षातील कोणताही ग्रह आपणांवर खूष नाही.

ग्रहांच्या या नाखुषीमुळे फारसे बिघडेल असे नाही, पण सहसासहजी अपेक्षेप्रमाणे काही घडणार नाही. भागीदारीचे व्यवहार चिघळू लागतील, कौटुंबिक वातावरण अप्रसन्न दिसू लागेल. याच वेळी जुळतेमिळते घेण्याच्या मनोवृत्तीची खरी गरज भासेल.

दि. १५–१८–१९ अनिष्टातूनही इष्टकाल शोधून काढण्यात यशस्वी व्हाल.

**कुंभ :** आजवर मोठ्या क्लेशदायक प्रसंगांना आपण निर्धाराने तोंड दिलेत– आणि त्या निर्धाराचे श्रेय म्हणूनच सध्याचे अपेक्षित यशाचे दिवस तुमच्या वाट्यास येत आहेत. त्या शुभकालाचे प्रसन्न मनाने स्वागत करा.

या आठवड्यातील रवि–हर्षलाच्या विशेष योगाचा आपल्या व्यवसायधंद्यावर, सामाजिक जीवनावर परिणाम होईल. नवे स्नेहसंबंध जोडले जातील, वरिष्ठांच्या कृपेचा साक्षात्कार घडू लागेल, न होणारी कामे झटपट यशस्वी ठरायला लागतील.

जुलैअखेरच्या आठवड्यात मंगळ षष्ठात उतरताच विरोधकांना ठोकरून काढणे सहज शक्य होईल.

दि. १६–१७–१८ येथूनच अनुकूल काल अनुभवण्यास मिळू लागेल.

**मीन :** तुमचा अनिष्ट काल ओसरू लागल्याची लक्षणे स्पष्ट दिसायला लागतील. आता तुमचा प्रगतीचा मार्ग सहसा कोणीच अडवू शकणार नाही.

कोमेजलेल्या मनाला प्रसन्नता येऊ लागेल, नोकरीधंद्याचे न सुटणारे गणित आता सुटायला फारसा वेळ लागणार नाही. आपल्या नोकरीतील अडीअडचणी त्वरित दूर व्हायला लागतील. हितशत्रूंची कारस्थाने त्यांच्याच अंगावर उलटू लागतील, हाती अनेक मार्गांनी पैसा यायला लागेल. स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या आपण आता निश्चित पार पाडू असा आत्मविश्वास निर्माण होऊ लागेल.

दि. १४–१६–१८ हे दिवस अपेक्षित यश पदरी टाकून जातील.

○

## मॅकबर्ड

[ पृष्ठ ९ वरून ]

पक्षीय मेळाव्याच्या दालनात रॉबर्ट केन–ओ–डंक आणि मॅकबर्ड यांचा अंतिम सामना झडतो. परंतु प्रतिस्पर्ध्याचा वार लागण्याच्या आतच हृदय बंद पडून मॅकबर्ड कोसळतो. मरतानाही म्हणतो, अशा प्रकारे एक उमदे काळीज बंद पडले !

नाटकाचा शेवट रॉबर्ट केन–ओ–डंक जनतेला नवा राष्ट्राध्यक्ष म्हणून देतो, त्या शोकरसपूर्ण, धीरगंभीर संदेशाने केला आहे. आणि हा संदेश पुनश्च, मॅकबर्डने जॉन केन–ओ–डंकच्या खुनानंतर दिला तोच अक्षरशः आहे !

असे हे भेदक, दाहक, नाट्यसंपन्न नाटक. यातील वर्तमानकालीन संदर्भ न सांगताही लक्षात येतात. शेक्सपिअरच्या 'मॅकबेथ'च्या बळाचा पूर्ण उपयोग करून घेऊन हे वर्तमानकालाचे नवे जळते संदर्भ घेऊन प्रेक्षकांसमोर विलक्षण प्रभावीपणे उभे राहते. नट अभिनयात थोडेफार कमी पडले तरीही प्रेक्षकाला आपल्याबरोबर फरफटवीत नेण्याइतका त्याचा विषय आणि त्याची उभारणी जबरदस्त वाटते. नाट्यातल्या अत्याधुनिक पंथांच्या गर्दीत हे नवे तितकेच जुने आणि जुने तेवढेच तद्दन नवे नाटक आपले स्वतंत्रच स्थान ठेवून राहिले तर नवल नव्हे.

हे खरेच की, काळाबरोबर यातले संदर्भ पुसटतील आणि मग हे नाटकही मागे पडेल. परंतु तरी बिघडत नाही. आज हे अमेरिकेतल्या बड्याबड्यांना बेचैन करून राहिले आहे. सामान्य प्रेक्षक यावर लट्टू आहेत, हे काय थोडके आहे ? ○


# पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

# अन्नस्वतंत्रता आणि विनोबा

बाहेरून धान्य येते त्यात भ्रष्टाकार किती, गोंधळ किती ? १९५१ सालची गोष्ट आहे. दोन वर्षांनंतर बाहेरून धान्य मागविणार नाही अशी नेहरूंनी प्रतिज्ञा केली. दोन वर्षांत तसे झाले नाही. बाहेरून धान्य मागविण्याची पाळी आली; तेव्हा मी म्हटले की, नेहरूंनी राजीनामा द्यावा. पंडितजींचे मला पत्र आले, " दिल्लीला ताबडतोब या, इतमिनानसे बात करेंगे. आज्ञेप्रमाणे तत्काळ निघालो व १४ नोव्हेंबरला पदयात्रा करीत पोहोचलो.

त्या वेळी मी सांगितले की, धान्याबाबत परावलंबन अत्यंत धोक्याचे आहे. दोन दिवस चर्चा झाली. त्यानंतर प्लॅनिंग कमिशनच्या सदस्यांसोबत चर्चा झाली. अकरा दिवस तेथे राहिलो. त्या वेळी ते म्हणत होते, ' ब्रह्मदेशातून तांदूळ का घेऊ नये ?' म्हणजे मी त्या वेळी ' जयहिंद 'ची भाषा बोलत होतो, तर ते मला ' जयजगत् 'च्या गोष्टी सांगत होते. मी त्यांना सांगितले, की ' वर्ल्ड फेडरेशन '—' जागतिक संयुक्त संघ '– जरी स्थापन झाला तरी जीवनाच्या प्राथमिक गरजांबाबत परावलंबन धोक्याचे आहे. अशी माझी साक्ष नियोजन मंडळासमोर आहे. आजही म्हणतात की, आम्ही शेतीकडे अधिक लक्ष देऊ. परंतु धान्याचे भाव खालीवर होत राहिले तर धोका आहे. नोकरांनाही वेतनाचा काही भाग धान्यात द्यावा असे शास्त्रीजींना मी ते भेटायला आले असताना सांगितले आहे.

अकोला जिल्ह्याच्या कार्यकर्त्यांसमोरील प्रवचन
परंधाम आश्रम : पवनार
ग्रामवैभव मासिक : नोव्हेंबर १९६७ अंक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९,